अतारांकित प्रश्नोत्तरांची १० वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

जिंतूर (जि.परभणी) तालुक्यात दहावी व बारावीच्या परीक्षेत ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रांवर होत असलेल्या गैरप्रकार

(१) ५९३ (३०-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यात दहावी व बारावीच्या परीक्षेत ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रावर सर्रास विद्यार्थ्यांना पास करण्यासाठी गुत्तेदारी पद्धतीचा अवलंब केला जात असून ठराविक रक्कम विद्यार्थ्यांनी दिल्यास पास करण्याची हमी दिली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकाराच्या कॉपी सेंटरमुळे शिक्षणाचा दर्जा दिवसेंदिवस खालावत असून शहरी भागात असणारे विद्यार्थी देखील ग्रामीण भागात कॉपी सेंटरच्या ठिकाणी प्रवेश घेऊन पास होत असल्याने त्याचा गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह कॉपीमुक्त अभियान राबविण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (२९-०८-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षांमध्ये होणा-या कॉपी प्रकरणांवर आळा घालण्यासाठी व परीक्षा निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी यावर्षी राज्यामध्ये कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात आले होते. या अभियानांतर्गत शासन स्तरावरुन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. परीक्षांचे आयोजन योग्य प्रकारे होण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची स्थापन करण्यात आली होती.

तसेच परीक्षा केंद्रावर बैठे पथक नेमण्यात आले होते व इतर परीक्षा केंद्रांना भेट देण्यासाठी भरारी पथक तयार करण्यात आले होते. मागील ५ वर्षामध्ये ज्या परीक्षा केंद्रावर कॉपी प्रकरणे आढळून आली होती अशा केंद्रावरील केंद्र संचालक, पर्यवेक्षक व इतर कर्माचारी यांच्या नियुक्तीत बदल करण्यात आले होते. तसेच गैरप्रकरणांवर Maharashtra Prevention of Malpractices Act -१९८२ अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सहा नदीजोड प्रकल्पाबाबत

(२) ६३८ (२४-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहा नदीजोड प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकणामध्ये प्रत्येकी किती एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे,
(३) असल्यास, सदरचा नदी जोड प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन (२५-०८-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे.

राज्यात वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प, दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, नार-पार-गिरणा या ४ नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नदीजोड योजनांपैकी वैनगंगा - नळगंगा नदीजोड योजनेमुळे ३,७१,२७७ हे., दमणगंगा-एकदरे-गोदावरी योजनेमुळे १२७५३ हे., दमणगंगा-वैतरणा-गोदावरी योजनेमुळे ३३११० हे. व नार-पार-गिरणा योजनेमुळे ४९५१६ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या उपरोक्त नदीजोड योजनांमुळे विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील ४६६६५६ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.
(३) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नदीजोड योजनांपैकी वैनगंगा - नळगंगा नदीजोड योजनेस १० वर्षे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व नार-पार-गिरणा योजनेस ७ वर्षे पुर्णत्व कालावधी नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विष्णुपुरी (जि.नांदेड) जलाशयाची पाईप लाईन दुरुस्ती करणेबाबत

(३) ७३७ (२३-०४-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील स्वर्गीय श्री. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी (जि.नांदेड) जलाशयाच्या लाभक्षेत्रातील शेती प्रकल्पांना मिळणाऱ्या पाण्याच्या वेळापत्रकानुसार शेतकऱ्यांची शेती अवलंबून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलाशयाच्या पाईप लाईनची वेळोवेळी कोट्यवधी रुपये खर्च करुनही कोणतीही दुरुस्ती करण्यात आली नसल्याने जीर्ण झालेली पाईपलाईन माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान फुटली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाईप लाईन फुटल्याने रब्बी पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुनही पाईपलाईन दुरुस्ती न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०२.१२.२०२४ पासून सुरू झालेल्या पहिल्या आवर्तनादरम्यान दिनांक २९.१२.२०२४ रोजी उद्धरण नलिका क्र.१ सा.क्र. १२१५ मी. येथे फुटली होती.
(३) हे खरे नाही.

फुटलेल्या उद्धरण नलिकेच्या दुरूस्तीचे काम पूर्ण करून दिनांक ०३.०१.२०२५ पासून पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आलेला आहे.
(४) सदर योजनेचे आयुष्यमान संपले असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

विष्णुपुरी उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत नवीन पंप व उद्धरण नलिका बसविण्याच्या विशेष दुरूस्ती कामाची निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. निविदा निश्चित करून निधी उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कातवडी-कोढूर-निळकंठेश्वर (जि. पुणे) रस्त्यावर मुठा नदीवरील पूल आणि बंधारा प्रकल्पाच्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत

(४) ८०५ (२३-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कातवडी-कोढूर-निळकंठेश्वर (जि. पुणे) रस्त्यावर मुठा नदीवरील पूल आणि बंधारा प्रकल्पासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळोवेळी पाठपुरावा करूनही पाटबंधारे विभागाने ना-हरकत प्रमाणपत्रासाठी आवश्यक कार्यवाही वेळेत केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या सर्वसाधारण मांडणी आराखड्यावर वेळेत निर्णय घेण्यासाठी व पाटबंधारे विभागातील प्रक्रिया सुधारण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,
(३) तसेच, या प्रकल्पाच्या विलंबामुळे स्थानिक नागरिकांना होणाऱ्या गैरसोयींच्या संदर्भात शासन कोणती तातडीची कार्यवाही करणार आहे,
(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम आणि पाटबंधारे विभाग यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी आणि प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना लागू करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे खरे नाही.

कातवडी कोंढुर रस्ता डावजे येथे मुठा नदीवर जलसंपदा विभागाचा ४.२५ मी. रुंदीचा रस्ता असलेला व ३० वर्षापुर्वी बांधलेला को.प. बंधारा असून या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ७.५० मी. रुंदीचा नवीन ब्रिज कम बंधारा बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या सर्वसाधारण आराखड्यानुसार मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे या कार्यालयाकडून दिनांक १२/०३/२०२४ रोजी तत्वत: ना-हरकत देण्यात आली आहे.

यामध्ये बंधाऱ्यात द्वार बसविण्याची व्यवस्था, द्वार संकल्पन व परीचलनासह बंधाऱ्याचे सविस्तर संकल्पन सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संकल्पनात बदल करुन द्वाराऐवजी बर्गे (Needle)प्रस्तावित करुन बंधाऱ्याचे सुधारीत सविस्तर संकल्पन सादर केले आहे. यानुसार क्षेत्रिय पडताळणी करुन सदर ब्रिज कम बंधारा बांधण्यास मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे या कार्यालयाकडून दिनांक २४.०४.२०२५ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभागाचे माजी उप अभियंता यांचे निवृत्तीवेतन प्रलंबित असल्याबाबत

(५) ८२१ (२३-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाचे माजी उप अभियंता यांचे निवृत्तीवेतन प्रलंबित राहण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी शासन कोणती चौकशी करणार आहे,
(२) असल्यास, वयोवृद्ध निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन तातडीने निकाली काढण्यासाठी जलसंपदा विभागात कोणती सुधारित प्रक्रिया राबवली जाणार आहे काय,
(३) असल्यास, प्रलंबित निवृत्तीवेतन प्रकरणे भविष्यात वेळेत निकाली काढण्यासाठी विभागीय स्तरावर कोणती धोरणात्मक सुधारणा केली जाणार आहे,
(४) असल्यास, शासनस्तरावर सन २०२२ मध्ये देण्यात आलेल्या निर्देशांची अद्याप अंमलबजावणी का झाली नाही, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०९-२०२५) : (१) ते (४) श्री. सुधीर कृष्णाजी कुलकर्णी हे जलसंपदा विभागातून उपविभागीय अधिकारी पदावरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. कुलकर्णी यांचे मुळ सेवापुस्तक गहाळ झाले असल्याने दुय्यम सेवा पुस्तक तयार करण्यात आले. श्री. कुलकर्णी हे त्यांच्या संपुर्ण सेवाकालावधीत ब-याच वेळा अनधिकृत रजेवर होते. त्यांचा सेवाकालावधील एकूण रजेचा कालावधी ०७ वर्ष १० महिने इतका आहे. त्यांच्या सेवाकालावधील काही कालावधीच्या रजा मंजूर नसल्याने त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे देय असलेले लाभ अद्याप प्रलंबित आहेत. श्री. कुलकर्णी यांच्या सेवापुस्तकात रजेच्या योग्य नोंदी घेण्यात आलेल्या नसल्याचे दिसून आल्याने शासनाच्या दिनांक १९ मार्च, २०२० च्या पत्रान्वये श्री.कुलकर्णी यांच्या मूळ/दुय्यम सेवापुस्तकात रजेच्या अद्ययावत नोंदी घेवून सेवापुस्तक शासनास तात्काळ सादर करणेबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, जलसंपदा विभाग, मुंबई परिमंडळ, ठाणे कळविण्यात आले होते. त्यानुसार अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, जलसंपदा विभाग, मुंबई परिमंडळ, ठाणे यांनी श्री. कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी सेवानिवृत्त यांच्या सेवापुस्तकात रजेच्या नोंदी घेऊन अद्ययावत सेवापुस्तकासह दिनांक ०१/०१/१९८७ ते दिनांक २२/०८/१९९१ या कालावधीतील अनधिकृतपणे उपभोगलेल्या गैरहजेरीच्या १६९४ दिवस तसेच दिनांक ०१/१२/२००८ ते दिनांक १९/१०/२००९ या कालावधीतील ३२४ दिवस अशा एकूण २०१८ दिवसांच्या अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी हा “अकार्यदिन रजा” (DIES NON) मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात केलेला आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा-२४०५/(प्र.क्र.५/०५/सेवा-८, दिनांक २३.०८.२००५ अन्वये निवृत्तीपूर्व असाधारण रजा (पाच वर्षापर्यंत) मंजूर करण्याचे अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार श्री. कुलकर्णी यांच्या दिनांक ०१.०१.१९८७ ते दिनांक २२.०८.१९९१ या कालावधीतील १६९४ दिवसाच्या गैरहजेरीचा कालावधी “अकार्यदिन रजा” (DIES NON) म्हणून शासनाच्या दिनांक ०८.०५.२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आलेला आहे. आता, श्री. कुलकर्णी यांच्या दिनांक ०१/१२/२००८ ते दिनांक १९/१०/२००९ या कालावधीतील ३२४ दिवसांच्या रजा मंजूर करणे आवश्यक आहे. परंतु सदर रजा पाच वर्षापुढील कालावधीच्या असल्यामुळे वित्त विभागाकडून मंजूर होणे आवश्यक आहे. यास्तव सदर रजा मंजूरीबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर श्री. कुलकर्णी यांच्या सेवानिवृतीवेतनाच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, जलसंपदा विभाग, मुंबई परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या सिंचित क्षेत्राची आकडेवारी उपलब्ध नसल्याबाबत

(६) ८९४ (२५-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात मागील १४ वर्षापासून राज्याच्या सिंचित क्षेत्राची आकडेवारी उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे विभागनिहाय सिंचन अनुशेष आणि राज्याची संभाव्य वाटचाल निश्चित करण्यात तांत्रिक अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील माहिती या अहवालात उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.
१.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवालातील जलसंपदा विभागांतर्गत पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता व मोठे, मध्यम व लघु प्रकल्पाखालील कालवा व नदीद्वारे सिंचित क्षेत्र तसेच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील विहिरींव्दारे सिंचन क्षेत्राची माहिती दरवर्षी उपलब्ध करुन देण्यात आली असून दरवर्षीच्या प्रकाशनात समाविष्ट करण्यात आली आहे.
२.राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र याबाबतची परिशिष्ट ७.५ अंतर्गत माहिती जलसंपदा विभागाच्या दिनांक:- २६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शासननिर्णयान्वये विहित केलेल्या पध्दतीनुसार तयार करणे अपेक्षित आहे. यासाठी जलसंपदा विभागाच्या समन्वयाने गावपातळी, तालुकापातळी व जिल्हापातळी वरील माहिती तयार करणेस्तव प्रपत्र क्र. १ ते ७ ची निर्मिती करण्यात आली असून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी त्या प्रपत्रात जिल्हास्तरीय माहिती तयार करुन कृषि आयुक्त यांच्याकडे संकलनासाठी सादर करावयाची आहे. तद्नंतर कृषि आयुक्त यांनी सदर माहिती यथायोग्यरित्या संकलित करुन व त्याची सविस्तर छाननी करुन अंतिम करणे अपेक्षित आहे. तथापि, आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याकडे सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून माहिती अप्राप्त असल्याने, किंवा माहिती प्राप्त असली तरी अपूर्ण व त्रोटक असल्याने राज्याच्या समग्र माहितीचे संकलन प्रलंबित आहे.
(२) नाही.
सद्यस्थितीत विदर्भातील अकोला जिल्ह्यात २५१८५हे., आणि बुलढाणा जिल्ह्यात ३०१३५ हे., तसेच मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात ६१९८हे., इतका सिंचनाचा अनुशेष शिल्लक आहे.
सन २०२५-२६ या वर्षामध्ये अनुशेष निर्मुलनाकरिता अकोला व बुलढाणा जिल्ह्यासाठी एकूण रू. १६४० कोटी आणि हिंगोली जिल्ह्यासाठी रू. १४० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.
(३) सदर माहिती संकलित होत नसल्याने जलसंपदा विभागाने गावपातळी, तालुकापातळी व जिल्हापातळीवर सिंचित क्षेत्रांची माहिती संकलित करण्याच्या प्रपत्रात सुधारणा करणेस्तव अभ्यासगटाच्या रचनेचा शासन निर्णय दिनांक २३.१२.२०२४ रोजी निर्गमित केलेला आहे. अभ्यासगटाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोरणा मध्यम प्रकल्प (ता.शिराळा, जि.सांगली) या धरणाची दुरुस्ती करण्याबाबत

(७) ९३० (२४-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोरणा मध्यम प्रकल्प (ता.शिराळा, जि.सांगली) या धरणातील पाण्याचा वापर पिण्यासाठी, शेतीच्या सिंचनासाठी होत असूनही सदहू बंधाऱ्यावरती मोठ मोठी झाडे-झुडपे वाढलेली असणे, बंधाऱ्याची डागडुजी न केल्यामुळे बंधाऱ्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या देखभालीकडे संबंधित विभागाचे पुर्णत: दुर्लक्ष होत असून सुरक्षा रक्षक तसेच पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी कोणताही कर्मचारी वर्ग नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पावसाळयात मोठया प्रमाणात अतिवृष्टी होत असल्याने धरणाच्या पाणीपातळीत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने तेथील स्थानिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोरणा धरणाच्या सुशोभिकरण करण्यासह नौकानयन तसेच पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत स्थानिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार मोरणा धरणाच्या दुरुस्तीसह आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

मोरणा मध्यम प्रकल्पांतर्गत कालवे नसून धरणाच्या खालील बाजूस मोरणा नदीवर असलेल्या बिऊर, धुमाळवाडी आणि मांगले या तीन को.प. बंधाऱ्यात धरणातून पाणी सोडून घेऊन खाजगी उपसाद्वारे पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी दिले जाते.

सदर को.प. बंधाऱ्याच्या ठिकाणी वाढलेली व पूरामुळे वाहून आलेली झाडे झूडपे आवश्यकतेनुसार नियमित देखभाल व दुरुस्ती अंतर्गत काढण्यात येतात. तसेच धरण माथ्यावरील व धरणाच्या खालील बाजूकडील झाडे झूडपे, यांत्रिकी संघटनेमार्फतच्या वार्षिक पाखरण कार्यक्रमांतर्गत काढण्यात येतात.

को.प.बंधाऱ्याची दुरावस्था झालेली नसून माहे ऑक्टोबरमध्ये या बंधाऱ्यांमध्ये लोखंडी बर्गे बसवून धरणाच्या मुख्य विमोचकामधून पाणी सोडून घेऊन पाणी वापर केला जात आहे.

(२) हे खरे नाही.

मोरणा मध्यम प्रकल्पातंर्गतच्या बिऊर, धुमाळवाडी व मांगले या ३ को.प. बंधाऱ्याची देखभाल दुरुस्ती दरवर्षी सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीतून प्राप्त होणा-या निधीतून आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. सन २०२४-२५ मधील सरळसेवा भरतीमधून वर्ग ३ मधील क्षेत्रीय कर्मचारी सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी उपलब्ध झालेले आहेत.

(३) हे खरे नाही.

मोरणा माती धरण (Earthen Dam) असून हे व्दारयुक्त धरण नाही. धरणास व्दारविरहीत सांडवा असून पावसाळयात सांडव्यावरुन वाहणा-या विसर्गाबाबत धरणाच्या खालील बाजुकडील ग्रामस्थांना नदीतील पाणीपातळीबाबत/ वाढीबाबत नियमितपणे पुर्वकल्पना देणेत येते.

(४) याबाबत कोणतीही मागणी प्राप्त नाही.

(५) मोरणा धरणाच्या दुरुस्तीबाबतचे प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

तसेच सद्यस्थितीत सन २०२४-२५ मधील सरळसेवा भरतीमधून सिंचन व्यवस्थापनासाठी वर्ग-३ चे कर्मचारी पाणी नियोजनासाठी उपलब्ध झालेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील धान्य साठवणूक व फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी गोदाम उभारण्याबाबत

(८) १०१६ (३०-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धान्य साठवणूक व गोदाम बांधणीकरिता विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमध्ये ३०० ते १००० मे. टन क्षमतेची गोदाम गडचिरोली व नंदुरबारसारख्या आदिवासी भागांतही उभारली जाणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनामार्फत घोषित करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गोदाम मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम तसेच कोंकण महसूल भागांतसुध्दा धान्य व फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी उभारण्याचे शासनाचे धोरण आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (१३-०८-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने सर्व राज्यांसाठी सहकार क्षेत्रात जगातील सर्वात मोठी धान्य साठवणुक योजना घोषित केली आहे. त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात सुरु असून, ज्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांकडे गोदाम बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे, अशा संस्थांची निवड करण्यात येत आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना MCDC/NBCC/NCCF या संस्थांकडून Detail Project Report (DPR) तयार करावयाचा असुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज उभारणीद्वारे गोदाम बांधकाम करावयाचे आहे.

(२) होय.

सदर योजना संपूर्ण राज्यभर लागू आहे.

(३) जगातील सर्वात मोठी धान्य साठवणुक योजने अंतर्गत राज्यात सद्यस्थितीत ५४ गोदामांचे बांधकाम करण्यात आले असून, ०९ गोदामांचे बांधकाम प्रगती पथावर आहे. या व्यतिरिक्त १०० विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची गोदाम बांधकामासाठी निवड करण्यात आली असून गोदाम बांधकामाबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राजेवाडी म्हसवड (जि.सांगली) तलावाचा जिहे कठापूर व उरमोडी योजनेमध्ये टेल टँक म्हणून समावेश करण्याबाबत

(९) ११२२ (२३-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजेवाडी म्हसवड (जि.सांगली) तलावाचा जिहे कठापूर व उरमोडी योजनेमध्ये टेल टँक म्हणून समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक ०७ जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ब्रिटिशकालीन तलावाचा जिहे कठापूर योजनेमध्ये समावेश केल्यास परिसरातील आटपाडी येथील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजेवाडी म्हसवड तलावाचा जिहे कठापूर योजनेमध्ये तातडीने समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

गुरूवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना (जिहे कठापुर) जि. सातारा या योजनेसाठी उपलब्ध ६.३३२ टी.एम.सी. पाणी वापराचे नियोजन पूर्ण झाले असून प्रकल्पांतर्गत अतिरिक्त पाणी उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सांगली जिल्हयातील ताकारी उपसा सिंचन योजना लाभापासून वंचित असल्याबाबत

(१०) ११६३ (२८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील ताकारी उपसा योजनेच्या चारही टप्प्याचे व अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाले असतांनाही सुमारे ८ हजार ७९५ हेक्टर लाभक्षेत्र योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित लाभक्षेत्राला या योजनेचा लाभ मिळण्याकरिता किती कालावधी लागणार आहे, व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय, हे अंशतः खरे आहे.
ताकारी उपसा सिंचन योजना डिसेंबर, २०२३ मध्ये पूर्ण झालेली असून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे. सदर योजनेअंतर्गत कडेगांव, पलूस, खानापूर, वाळवा, तासगांव व मिरज तालुक्यातील एकूण २७४३० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

केंद्रीय अर्थसहाय्य निधीमधून लाभक्षेत्र विकास कामे (CADWM) सुरु असून यामध्ये ताकारी उपसा सिंचन योजनेचे १९,२९३ हे. क्षेत्राचा समावेश आहे. यापैकी सुमारे २५०० हे. क्षेत्रावरील कामे पूर्ण झालेली आहे. उर्वरीत १६७९३ हे. क्षेत्रावरील कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) व (३) ताकारी उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील एकूण २७४३० हे. सिंचन क्षेत्रापैकी सुमारे १८,६३५ हे. क्षेत्रास प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होत आहे. उर्वरीत ८७९५ हे. क्षेत्रास प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देणेकरिता लाभक्षेत्र विकास कामांच्या (CADWM) निविदा प्रक्रीया पूर्ण करून सदर कामे क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहेत. सदर कामे डिसेंबर, २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

हूमन सिंचन प्रकल्प (ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर) कार्यान्वित करण्याबाबत

(११) १२०७ (२५-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयासाठी सिंचन विषयक दृष्टीने वरदान ठरणारा प्रकल्प हूमन सिंचन प्रकल्प अद्याप कागदोपत्रीच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९८२ मध्ये या प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली असून गेल्या ४२ वर्षांपासून हा प्रकल्प प्रलंबित असून या प्रकल्पावर २१० कोटीहून अधिक रूपयांचा खर्च झाला असून आजमितीस प्रकल्पाची किंमत साडेतीनशे कोटीहून अधिक रुपयांपर्यंत गेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बफर झोन राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडून अभिप्राय प्राप्त न झाल्याने हा प्रकल्प चार दशकांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (०७-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पाच्या प्राथमिक कामास वर्ष १९८२-८३ पासून सुरुवात करण्यात आली. वर्ष १९८२-८३ ते १९८४-८५ या कालावधीत प्रकल्पाच्या उपधरणाचे बांधकामास सुरुवात करण्यात आली. तसेच उपधरण व मुख्य धरणस्थळाला जाण्यासाठी पोचमार्ग तसेच पुरकेपार, नवरगांव व सिंदेवाही येथील स्थायी / अस्थायी स्वरुपाच्या निवासी इमारती, विभागीय व उपविभागीय कार्यालयासाठी इमारती तसेच निरीक्षण गृह इत्यादी कामे बहुतांशी पूर्ण करण्यांत आली. या प्रकल्पाच्या बुडित क्षेत्राकरीता व बांधकामाकरीता वनक्षेत्राची आवश्यकता आहे. तथापी वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमुळे प्रकल्पाची कामे सन १९८४-८५ पासून स्थगित आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

या प्रकल्पास रु. ३३.६८ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त होती. या प्रकल्पाच्या प्राथमिक कामास सुरुवात करण्यात आली होती, परंतु वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमुळे प्रकल्पाची कामे सन १९८४-८५ पासून स्थगित करण्यात आली.

सदर प्रकल्पाची प्रथम प्रशासकीय मान्यता रु.१०१६.४९ कोटी हे असून आजमितीस प्रकल्पावर रु. २११.५६ कोटी खर्च झालेला असून त्यापैकी मुख्यत्वे तत्वत: मान्यतेच्या पत्रातील अटीनुसार वनाचे नक्त वर्तमान मुल्य (NPV) पर्यायी वनीकरण मुल्य व पाणलोट क्षेत्र उपचार इतर कामाकरीता वनविभागाकडे रु.१८८.४० कोटी चा भरणा केलेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्पाचे बुडित क्षेत्र व बांधकामाकरीता १९२५.५५ हेक्टर वनजमीनीची आवश्यकता आहे. सदर प्रकल्पाला केंद्रीय वनमंत्रालय, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, व राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता अप्राप्त आहे.

(४) राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेण्याबाबत प्रस्ताव मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून त्यांचे पत्र दिनांक २०.१०.२०१६ अन्वये शासनास सादर करण्यात आला.

दिनांक २४.०१.२०२० रोजी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीचे अनुषंगाने मुख्य अभियंता व इतर अधिकाऱ्यांनी दिनांक २५.०१.२०२० रोजी प्रत्यक्ष पर्यायी स्थळाची पाहणी करुन पर्यायी धरण स्थळ निवडण्यात आले व याबाबतचा अहवाल दिनांक ०३.०३.२०२० अन्वये प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांना सादर करण्यात आला.

शासनाचे दिनांक २८.०८.२०२० च्या पत्रान्वये काही पर्यायांबाबत सविस्तर अभिप्राय सादर करण्याचे निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार महामंडळाचे पत्र दिनांक १६.१२.२०२१ अन्वये सदर प्रकल्पाचा तुलनात्मक अभ्यास शासनास सादर करण्यात आला.

मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८.११.२०२३ रोजी बैठक संपन्न झाली व बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण नवी दिल्ली ह्यांचे प्रकल्पाचे अनुषंगाने निर्देशित सूचनांची अंमलबजावणी केल्यास प्रकल्प आर्थिक व्यवहार्यतेत बसत नसल्यास प्रकल्प स्थगित करावा लागेल, असे मा. मुख्य सचिव यांनी सूचित केले. तथापि, गोदावरी तंटा लवादानुसार, हुमन नदी प्रकल्प स्थळ हे राज्यासाठी १०० % पाणीवापराचे स्थळ असल्याने लवादानुसार वाटप झालेले पाणी वापराचे अनुषंगाने प्रकल्प फेरनियोजन अभ्यासण्यात येत आहे. त्याअनुषंगाने फेरनियोजनाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय

(१२) १२१९ (३०-०४-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील पिजी विभागातर्फे शिक्षण शास्त्र, शारीरिक शिक्षण, राज्यशास्त्र आणि विज्ञान या विषयाची दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास पीएचडी म्हणजेच डॉक्टरेट करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी आरआरसी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावेळी विद्यार्थ्यांसाठी कोणतीही आसन व्यवस्था केली नसल्याने त्यांना जमिनीवर बसावे लागल्याने सिनेट सदस्य तथा विद्यार्थी प्रतिनिधी डॉ. महेश मगर यांनी विद्यापीठ प्रशासनाबद्दल नाराजी व्यक्त केल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विद्यापीठात गत अनेक वर्षांपासून शैक्षणिक कामास विलंब होणे, शुल्क भरणा तसेच इतर खिडक्यांवर कर्मचारी उपलब्ध नसणे यामुळे विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत अनेकदा तक्रार करूनही विद्यापीठाकडून याची कोणतीही दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबधीतांवर कारवाई करून विद्यार्थ्यांची अनेक प्रकारे होणारी गैरसोय दूर करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२५-०६-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.

दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी ११:०० वाजता विविध विषयात पीएच.डी. करण्यासाठीच्या विद्यार्थ्यांसाठी आरआरसी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीसाठी पुरेशी आसनव्यवस्था करण्यात आली होती. सदर बैठकीस सकाळी १० वाजेपासून विद्यार्थी त्यांच्या पालकांसह उपस्थित झाले होते. तथापि, पालकांची संख्या जास्त झाल्याने काही विद्यार्थी त्यांच्या फाईल्स खाली बसून व्यवस्थित लावत होते.
(३) व (४) हे खरे नाही,

विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारींची त्या-त्या वेळी योग्य ती दखल घेऊन तक्रारींचे निवारण करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

सांगोला (जि.सोलापूर) येथील माण, कोरडा या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधण्याबाबत

(१३) १२४० (२५-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण व कोरडा (ता. सांगोला, जि.सोलापूर) या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधल्याने नदीकाठच्या गावांची शेती पूर्णपणे ओलिताखाली येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माण कोरडा नद्यांचे पाणी वाहून गेल्याने रब्बी हंगाममध्ये शेतकऱ्यांना पिकासाठी पाणीसाठा उपलब्ध राहत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात रब्बी ज्वारी, मका आणि डाळिंब बागायत शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार नाही यासाठी शासनाकडून कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, किती कालावधीत लागणार आहे, नसल्याची विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

माण व कोरडा नद्यांवर नव्याने को.प. बंधारे बांधणे प्रस्तावित नाही.

सद्यस्थितीत सांगोला तालुक्यातील अस्तित्वात असणारे माण नदीवरील १७ को.प.बंधारे व कोरडा नदीवरील २ को.प. बंधारे असे एकूण १९ को.प.बंधाऱ्यांचे मार्फत सिंचन व्यवस्थापनाचे काम करणेत येते. यावर सांगोला तालुक्यातील १३३२० हे. क्षेत्र सिंचनाखाली आहे.
(२) हे खरे नाही.

या बंधाऱ्यांमध्ये पाण्याच्या उपलब्धतेनुसार पाणीसाठा केला जातो.

(३) सद्यस्थितीत माण व कोरडा नदीवर को.प.बंधारे बांधणे प्रस्तावित नाही.

परंतु सांगोला तालुक्यातील अस्तित्वात असणाऱ्या को.प. बंधाऱ्यापैकी माण नदीवरील पुरामुळे काही बंधाऱ्यांचे अंशत: नुकसान झाले आहे. त्यानुसार ११ को.प. बंधाऱ्यांचे दुरुस्तीचे प्रस्ताव शासनास प्राप्त असून त्याबाबतची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक परीक्षा केंद्रांवरील प्रयोगशाळा नसल्याबाबत

(१४) १२९३ (०५-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात शालेय शिक्षण विभागाचे वतीने बोर्डाची परीक्षा अनेक केंद्रावर लवकरच सुरू होणार असून शाळेमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रयोग करण्याच्या अडचणी निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहावी - बारावीच्या सर्व शाळांमध्ये प्रयोगशाळा व विज्ञान शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी तसेच प्रयोग साहित्य परीक्षेच्या काळात न वापरता नियमित प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (२९-०८-२०२५) : (१)अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या मार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या बोर्ड परीक्षाचे आयोजन करण्यात आले होते.

नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांचेकडून यासंदर्भात माहिती मागविण्यात आली असता नागपूर विभागीय मंडळांतर्गत येणा-या चंद्रपूर जिल्हयातील उच्च माध्यमिक व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी कोणत्याही शाळेमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नसल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षांचेवेळी विद्यार्थ्यांना प्रयोग करावयाच्या अडचणी निर्माण झाल्याच्या कोणत्याही तक्रारी माहे जानेवारी २०२५ मध्ये नागपूर विभागीय मंडळास प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) इ. १० वी व इ. १२ वी विज्ञान शाखा असलेल्या चंद्रपूर जिल्हयातील शाळांमध्ये प्रयोगशाळा व शिक्षक उपलब्ध आहेत व इ. १० वी विज्ञान विषयाला नेमून दिलेल्या पाठयक्रमासोबतच विज्ञान शिक्षक प्रयोग घेत आहेत तसेच चंद्रपूर जिल्हयामध्ये सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामधील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरळीत पार पडलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

बेंबळा (जि.यवतमाळ) प्रकल्पाकरिता संपादीत शेतजमिनींचा मोबदला देण्याबाबत

(१५) १३१९ (२५-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळा (जि.यवतमाळ) प्रकल्पाकरिता संपादीत शेतजमिनींचा मोबदला अद्याप प्रकल्पग्रस्त शेतक-यांना मिळालेला नसल्याचे माहे जानेवारी २०२५ या महिन्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनोजा (देवी) येथील सर्व्हे नं. १७५ आराजी ३.४७ हे आर जागा व अन्य संपादीत जागांचा मोबदला संबंधितांना प्रदान करण्यात यावा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांना दिनांक १९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (०७-०८-२०२५) : (१)हे अंशतः खरे आहे.

बेंबळा नदी प्रकल्प, ता. बाभुळगाव, जि.यवतमाळ अंतर्गत कालव्यावरील शेतकऱ्यांचे भूसंपादन कायदा १८९४ नुसार २११२.२१ हे. आर. जमीन संपादीत करण्यात आलेली असून त्याचा मोबदला रु.७७.६५ कोटी वाटप करण्यात आलेला आहे. तसेच सरळखरेदीनुसार ४३९.७६ हे. आर. जमीन संपादीत करण्यात आलेली असून त्यावर रु.११५.४० कोटी रुपये वाटप करण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत कालव्यासाठी एकूण भूसंपादन ३५.२० हे. करणे शिल्लक आहे. नविन भूसंपादन कायदा-२०१३ च्या अधिनियमानुसार एकूण ५० प्रकरणे प्रगतीपथावर असून, उपरोक्त सर्व प्रकरणामध्ये निधी संबंधीत भूसंपादन अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आलेला आहे.

(२) होय,

(३) सदर भूसंपादन प्रकरणामध्ये विभागीय कार्यालयाचे दिनांक२८/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, वणी यांच्याकडे निधी जमा करण्यात आलेला असून पुढील कार्यवाही उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांच्याकडे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मार्थाजून व महादापूर (ता. झरी, जि.यवतमाळ) येथील सिंचन प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१६) १३४० (२५-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्थाजून व महादापूर (ता. झरी, जि.यवतमाळ) येथील शेतक-यांना सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी सन २००८ मध्ये महादापूर सिंचन प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम ७५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर सन २०१० मध्ये प्रकल्पाचे काम बंद करण्यात आले असून सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या १४ वर्षापासून सदर प्रकल्पाचे काम पूर्ण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, महादापूर भागातील शेतक-यांना सिंचन सुविधा निर्माण व्हावी याकरीता अपूर्ण असलेल्या महादापूर सिंचन प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन (१३-०८-२०२५) :(१) होय.

(२) होय.

(३) सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे:-

अ) प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र १५२.२२ हे. येत असून त्यामध्ये १५.६० हे. वनजमिन व ०.९६५ हे. सरकारी जमिनीचा अंतर्भाव असल्याचे निदर्शनास आले. बुडीत क्षेत्रात बाधीत होणारी वनजमिन वनविभागाकडून हस्तांतरीत करून घेणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

ब) प्रकल्पाचे बुडित क्षेत्र ८७ हे. ऐवजी १५२.२२ हे. अशी वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या पाणीसाठ्यातही वाढ होत आहे.

क) सुधारित पाणीसाठ्यास MWRRA ची मान्यता घेणे.

ड) प्रकल्पाच्या मंजूर प्रमा किंमतीपेक्षा जास्त खर्च होणार असल्यामुळे प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे.

(४) उपरोक्त आवश्यक मान्यतांपैकी MWRRA व प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. बाधीत वन

विभाग मान्यतेचा प्रस्ताव वनविभागाकडे सादर केला असून त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाची घळभरणी करून जून, २०२७ पर्यंत प्रकल्प कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बी फार्मसीच्या जागा रिक्त राहिल्याबाबत

(१७) १३५८ (३०-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यंदा बी फार्मसीची प्रवेश प्रक्रिया संथ गतीने सुरु असल्याने बी फार्मसीच्या ३४,०१० हजार प्रवेश निश्चित झाले असले तरी ८७ टक्के जागा रिक्त राहिल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त राहिलेल्या जागांसाठी जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-०९-२०२५) : (१) हे, अंशत : खरे आहे.
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण ५१५ संस्थांमधील ४१,२८२ प्रवेश क्षमतेपैकी २८,५६८ जागांवर प्रवेश झालेले आहेत. साधारणत: ३० टक्के जागा रिक्त राहिल्या आहेत.
(२) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय), नवी दिल्ली या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या शिखर परिषदेने मान्यता प्रक्रीयेसाठी दिनांक३०.११.२०२४ पर्यंत दिलेली मुदतवाढ तसेच राज्यात राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ ची लागू झालेली आचारसंहिता यामुळे सदर अभ्यासक्रमाच्या संस्थांना विलंबाने शासन मान्यता देण्यात आली. परिणामी प्रवेश प्रक्रीयेस विलंब झाला होता.
प्रवेश प्रक्रीयेस झालेला विलंब तसेच, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ नंतर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या संख्येत झालेली वाढ आणि तुलनेने या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी घटलेला कल विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या कामामध्ये स्थानिकांचा विरोध असतांनाही प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आल्याबाबत

(१८) १४०९ (२८-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ११ आणि नांदेड जिल्ह्यातील ७ ग्रामपंचायतीचा समावेश असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामाला काही गावाचा विरोध असूनही त्याकडे दुर्लक्ष करुन शासनाने प्रकल्पाचे काम सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प अधिका-यांकडून दलालांमार्फत स्थानिकांना अधिकच्या लाभाचे प्रलोभन देत दिशाभूल करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिकांचा विरोध असतांनाही प्रकल्पाचे काम सुरु करण्यास जबाबदार असणा-यांवर व अधिकच्या लाभाजी खोटी आश्वासने देणा-यावंर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०८-२०२५) : (१) हे खरे नाही.

प्रथम टप्प्यातील १८ पैकी १७ ग्रामपंचायती ह्या पेसा कायद्या अंतर्गत येत असल्यामुळे या १७ ग्रामसभेची संमती आवश्यक असून, त्याकरिता प्रथम टप्प्यातील यवतमाळ व नांदेड जिल्हयातील १८ गावात विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आलेल्या होत्या, त्यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ११ पैकी ०८ ग्रामसभेनी तसेच नांदेड जिल्हयातील ०७ पैकी ०१ ग्रामसभेने वैयक्तिक लाभाच्या अटीच्या अधीन राहुन प्रकल्पास समर्थन दिले आहे. त्यानुसार भूसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही महसुल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. उर्वरित विरोध असलेल्या गावांमध्ये भुसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही सुरु करण्यात आली असून, ०९ ग्रामपंचायती बाबत भूसंपादन व पुनर्वसन कायदा २०१३ अंतर्गत कलम ४१(३) व पंचायत (अनुसुचीत क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम १९९६ मधील कलम-२६ अन्वये पेसा ग्रामपंचायती करीता महसूल यंत्रणेमार्फत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यानंतर सदर गावामध्ये भुसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही सुरू करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उर्ध्व पैनगंगा ते निम्न पैनगंगा प्रकल्पापर्यंतच्या शिल्लक पाणी साठयातून नांदेड जिल्हयामध्ये सात उच्च पातळी बंधा-यांच्या कामाबाबत

(१९) १४१० (३०-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व पैनगंगा ते निम्न पैनगंगा प्रकल्पापर्यंतच्या शिल्लक पाणी साठयातून नांदेड जिल्हयामध्ये सात उच्च पातळी बंधा-यांची कामे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उच्च पातळी बंधा-यांचा लाभ उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात होणार असल्याने या बंधा-यांना उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचा भाग म्हणून मान्यता देवून प्रकल्पाच्या पाचव्या सुधारीत मंजुरी पैकी शिल्लक रक्कमेतून निधी उपलब्ध करून देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्प ते निम्न पेनगंगा प्रकल्पापर्यंतच्या शिल्लक पाणी साठ्यातुन नांदेड जिल्ह्यामध्ये सहा उच्च पातळी बंधाऱ्याची कामे करण्यास शासन पत्र क्र.संकिर्ण-२०२३/१५९२/प्र.क्र.६१०/मोप्र-२ दिनांक १६.०२.२०२४ अन्वये मान्यता दिली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

याबाबत यापूर्वी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खा.मा.अशोकराव चव्हाण यांनी दिनांक२४.०८.२०२४ अन्वये मा.उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांना लिहिलेल्या पत्रान्वये कालवा कामे व उच्च पातळी बंधारे कामे या दोन्ही कामास मिळून २५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली.

(३) उर्ध्व पेनगंगा प्रकल्पासाठी वर्ष २०२५-२६ अंतर्गत रु.४७५ कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद आहे. तसेच शासन अंशदान अंतर्गत अतिरिक्त रु.२०० कोटी व MIIP अंतर्गत रु.२०० कोटीची पूरक मागणी प्रस्ताव वित्त विभागाकडे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ सुरु करण्याकरिता निधी मिळण्याबाबत

(२०) १५७४ (२६-०४-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पहिले आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यासंदर्भातील अहवाल तयार केला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन त्यांच्या कौशल्याला चालना देण्याकरिता अभ्यासक्रम सुरु करुन अधिकाधिक रोजगारभिमुख प्रशिक्षण मिळण्यासाठी आदिवासी विद्यापीठ सुरु करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदिवासी विद्यापीठ सुरु करण्याकरिता निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाची संकल्पना आणि स्थापना प्रामुख्याने आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आली. तथापि, महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना स्थलांतरित होऊन गोंडवाना विद्यापीठाद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या उच्च शिक्षणाच्या संधींचा लाभ घेणे शक्य होत नाही. राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ प्रस्ताविण्यात आले होते. मात्र ते एकाच जिल्ह्यात स्थापन करावे लागेल. आदिवासी जमाति राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये विखुरलेल्या आहेत. आदिवासी जमातितील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण देऊन सर्व समावेशक शिक्षणाची भावना त्यांच्या मनात रुजविणे गरजेचे आहे. सदरची वस्तुस्थिती विचारात घेऊन आदिवासी जमातितील विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याऐवजी आदिवासी बहुल क्षेत्रातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठांमधील आदिवासी अभ्यास केंद्रांना बळकटी देण्याचा तसेच आदिवासीबहुल क्षेत्रातील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नव्याने आदिवासी केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये घेण्यात आला आहे. मानववंशशास्त्र अभ्यास, उपजिविका अभ्यास, आर्थिक सक्षमीकरण ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विविध आदिवासी भाषांचा अभ्यास, धातूशास्त्र, कापड आणि त्याचे उत्पादन तंत्रज्ञान, औषधी वनस्पतींचा अभ्यास, खनिजशास्त्र आणि आदिवासी भाषांचा अभ्यास, वन आणि पर्यावरणीय पर्यटन, उद्योजकता, जलमार्ग व्यवस्थापन, पूर आणि पूरोत्तर व्यवस्थापन असे अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम, उद्योगक्षम बनविण्यासाठी सदर अभ्यास केंद्रे कार्यरत राहतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा धरणाचा कालवा फुटून शेतीचे नुकसान झाल्याबाबत

(२१) १५८९ (२५-०४-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा धरणाच्या आवरे गावाजवळील उजवा कालवा फुटल्यामुळे १०० एकर क्षेत्रात लाखो लिटर पाणी गेल्याने भात शेती व शेतमालाचे नुकसान झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ५४ किलोमीटर लांबीच्या कालव्याच्या देखभालीसाठी केवळ एकच कर्मचारी तैनात असून त्याच्याकडून पाणीपट्टी वसुली व अन्य तद्नुषंगिक कामे देखील करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाहणी करुन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कालव्याची दुरुस्ती व त्याच्या देखभालीसाठी कर्मचारी संख्या वाढवून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२७-०६-२०२५) : (१) अंशतः खरे आहे.

दिनांक०४/०१/२०२३ रोजी भातसा सिंचन आवर्तन चालू असतांना उजवा कालवा कि.मी.१५ मधील सा.क्र.१४/५७० मी. मधील पाईप मोरीच्या बांधकामातून गळती होऊन कालवा भराव खचला व त्यामुळे सुमारे २९ एकर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे.
(२) अंशतः खरे आहे.

शासकीय मनुष्यबळ कमी असल्याने सिंचन व्यवस्थापनाची कामे पार पाडण्यासाठी बाह्य अभिकरणामार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून कामे पार पाडली जात आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) दिनांक०४/०१/२०२३ रोजी सिंचन आवर्तन सुरू असताना खचलेल्या कालवा भरावाची दुरूस्ती तातडीने करून दिनांक०९/०१/२०२३ पासून सिंचन आवर्तन पूर्ववत करून सिंचन पाणी पुरवठा सुरळीत केला आहे.
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे कृषी व जलसंपदा विभागामार्फत नुकसानीचा अहवाल प्राप्त करून प्रचलित शासन नियमांनुसार दिनांक१५/०२/२०२३ रोजी ₹१,६६,५७१/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली आहे.
कालव्याची नियमित देखभाल-दुरूस्तीची कामे वेळोवेळी आवश्यकतेनुसार यांत्रिकी विभाग व खाजगी बाह्य अभिकरणामार्फत करण्यात येत आहेत.
कालवा मजबुतीकरण व भविष्यात भराव क्षतिग्रस्त होऊन कालवा फुटीच्या घटना न होणेच्या दृष्टीने भातसा उजवा कालवा कि.मी. १ ते ५४ मध्ये महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) अंतर्गत अस्तरीकरण व भराव दुरूस्ती प्रस्तावित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील एकूण क्षेत्रापैकी केवळ पाच टक्के क्षेत्र सिंचनाखाली आले असल्याबाबत

(२२) १८३२ (२३-०४-२०२५). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुका गेल्या अनेक वर्षांपासून दुष्काळाचा सामना करीत असूनएकूण क्षेत्रापैकी केवळ पाच टक्के क्षेत्र गेल्या ५० वर्षापूर्वी सिंचनाखाली आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदगाव तालुक्याला किमान दहा टीएमसी पाण्याची गरज असून सद्यस्थितीत केवळ पाच टीएमसी पाणी उपलब्ध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदगाव तालुक्यासह मतदार संघातील सिंचन क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०८-२०२५) : (१) अंशत: खरे आहे,
नांदगाव तालुक्यातील एकूण भौगोलिक क्षेत्र १११२५९ हेक्टर इतके असून लागवडीलायक क्षेत्र ६५२५५ हेक्टर आहे. माणिकपुंज मध्यम प्रकल्पांतर्गत २५८२ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मिती झाली आहे. तसेच, नाग्यासाक्या मध्यम प्रकल्प व ८ लघु प्रकल्प मिळून एकत्रित निर्मित सिंचनक्षेत्र ४३९७ हेक्टर आहे. त्यामुळे, नांदगाव तालुक्यातील एकूण निर्मित सिंचन क्षेत्र सुमारे ९ % म्हणजे ६९७९ हेक्टर आहे.
(२) नांदगांव तालुक्यातील माणिकपुंज मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता ०.४९६१८ टी.एम.सी. इतकी आहे. तसेच, नाग्यासाक्या मध्यम प्रकल्प व ८ लघु प्रकल्पांचा एकूण उपयुक्त साठा ०.७६० टी.एम.सी. इतका आहे. त्यामुळे नांदगाव तालुक्यात एकूण १.२५६ टी.एम.सी. इतका उपयुक्त पाणी साठा आहे.
(३) माणिकपुंज प्रकल्पाचे एकूण २६८५ हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी जानेवारी २०२५ अखेर २५८२ हेक्टर सिंचन क्षेत्राची निर्मिती झाली आहे. उर्वरीत १०३ हेक्टर सिंचन निर्मितीसाठी ३ वितरीकांची कामे प्रगतीत असून मार्च, २०२६ अखेर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

त्या व्यतिरिक्त नाग्यासाक्या मध्यम प्रकल्प व ८ लघुप्रकल्पांची सिंचनक्षेत्र पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने कालव्यांचे सर्वेक्षण टप्याटप्याने करणे नियोजीत असुन, सर्वेक्षण अंती विशेष दुरुस्ती अंतर्गत सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे नियोजित आहे.

गिरणा उजवा व गिरणा उजवा वाढीव कालव्याची नार-पार-गिरणा नदी जोड योजनेअंतर्गत वहन क्षमता वाढविण्याकरीता नुतनीकरण, मातीकामाचे मजबुतीकरण करणे कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. उपरोक्त काम झाल्यावर नांदगाव मतदार संघातील मौजे शिरसोंडी, मांजरे, टाकळी, सोनज,कौळाणे, वऱ्हाणे इ. गावांचे सिंचनक्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ सुरु करण्याबाबत

(२३) १८६३ (०५-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पहिले आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अहवाल तयार केला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, त्यांच्या कौशल्याला चालना देणारे अभ्यासक्रम सुरु करावेत आणि त्यांना अधिकाधिक रोजगारभिमुख प्रशिक्षण मिळावे यासाठी लवकरात लवकर आदिवासी विद्यापीठ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-०६-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाची संकल्पना आणि स्थापना प्रामुख्याने आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आली. तथापि, महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना स्थलांतरित होऊन गोंडवाना विद्यापीठाद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या उच्च शिक्षणाच्या संधींचा लाभ घेणे शक्य होत नाही. राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ प्रस्ताविण्यात आले होते. मात्र ते एकाच जिल्ह्यात स्थापन करावे लागेल. आदिवासी जमाति राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये विखुरलेल्या आहेत. आदिवासी जमातितील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण देऊन सर्व समावेशक शिक्षणाची भावना त्यांच्या मनात रुजविणे गरजेचे आहे. सदरची वस्तुस्थिती विचारात घेऊन आदिवासी जमातितील विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याऐवजी आदिवासी बहुल क्षेत्रातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र

विद्यापीठ, जळगाव, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठांमधील आदिवासी अभ्यास केंद्राना बळकटी देण्याचा तसेच आदिवासीबहुल क्षेत्रातील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नव्याने आदिवासी केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये घेण्यात आला आहे. मानववंशशास्त्र अभ्यास, उपजिविका अभ्यास, आर्थिक सक्षमीकरण ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विविध आदिवासी भाषांचा अभ्यास, धातूशास्त्र, कापड आणि त्याचे उत्पादन तंत्रज्ञान, औषधी वनस्पतींचा अभ्यास, खनिजशास्त्र आणि आदिवासी भाषांचा अभ्यास, वन आणि पर्यावरणीय पर्यटन, उद्योजकता, जलमार्ग व्यवस्थापन, पूर आणि पूरोत्तर व्यवस्थापन असे अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम, उद्योगक्षम बनविण्यासाठी सदर अभ्सास केंद्रे कार्यरत राहतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे फुलसांगवी (ता. शिरुर जि. बीड) लगत उपसा जलसिंचन कॅनॉलद्वारे पाणी व्यवस्थापन करण्याबाबत

(२४) १९०१ (२३-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फुलसांगवी (ता. शिरुर, जि. बीड) लगत साठवण तलावाचे काम झालेले असून पडत असलेल्या कमी पावसामुळे बहुतांश वेळी तलाव पुर्ण क्षमतेने भरण्यासाठी मोठ्या अडचणींचा वारंवार सामना आजुबाजुच्या गावकऱ्यांना व फुलसांगवी ग्रामस्थांना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदफना नदीवर मोठ्या क्षमतेच्या बंधाऱ्याचे काम मंजुरीसह पुर्ण झाल्यास अथवा इतर पर्यायी उपयुक्त मार्ग अवलंबिल्यास उपसा जलसिंचन अथवा कॅनॉलद्वारे सदरील पाणी साठवण तलावामध्ये सोडल्यास येथील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे फुलसांगवी, मार्कडवाडी, हाजीपुर, व इतर ग्रामस्थांच्या निवेदनाच्या आधारे बीड शहरामध्ये नियोजित बैठक होऊन दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सत्वर कार्यवाही होऊन तेथील पुर्ण रितीने सर्व्हे होण्याबाबत कार्यवाही व्हावी याबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरील प्रकल्प माजलगांव धरणाचे उर्ध्व बाजूस आहे. माजलगांव धरणात तूट असल्याने त्याचे उर्ध्व बाजूस प्रस्तावित प्रकल्पासाठी पाणी उपलब्धता शक्य नाही. त्यामुळे सिंदफणा नदीवर मोठ्या क्षमतेचा बंधारा किंवा उपसा सिंचन योजना प्रस्तावित करता येत नाही.

(३) अंशत: खरे आहे.

ग्राम पंचायत फुलसांगवी ता.शिरुर, जि.बीड यांच्या वतीने श्री.रा.मा.जायभाये गाव प्रतिनिधी (फुलसांगवी) यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३०/११/२०२२ च्या अनुषंगाने निवेदन सादर केले आहे.

(४) माजलगांव धरणातील तुट पाहता त्याचे उर्ध्व बाजूस मोठ्या क्षमतेचा बंधारा अथवा उपसा सिंचन योजना प्रस्तावित करता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून परिक्षा हॉल तिकीट (प्रवेशिका) वर कास्ट कॅटेगरी (जात प्रवर्गाची श्रेणी) नमूद केल्याबाबत

(२५) १९५६ (०५-०५-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेकरीता वितरीत करण्यात येणाऱ्या हॉल तिकीट (प्रवेशिका) वर कास्ट कॅटेगरी (जात प्रवर्गाची श्रेणी) नमूद करण्याचा निर्णय शिक्षण मंडळाकडून घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हॉल तिकीट शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असून विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेच्या संकेतस्थळावरून हे हॉल तिकीट डाऊनलोड होवू शकणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांनी शाळा किंवा महाविद्यालय सोडल्यानंतर दाखल्यामध्ये कोणताही बदल करता येत नसल्याने शाळेच्या किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरवर विद्यार्थ्यांच्या जातीची, जातप्रवर्गाची नोंद असल्याने विद्यार्थ्यांच्या जातीचा उल्लेख फक्त दाखल्यावर असतो त्यात चूक झाली तर पुढील शिक्षणात अडचण येऊ शकते ते टाळण्यासाठी हॉल तिकींटावर जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.शालेय शिक्षण मंत्री, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी तातडीने तो उल्लेख हॉल तिकिटावरुन हटविण्याचे आदेश देऊन जातीचा उल्लेख नसलेली हॉल तिकिटे दिनांक २० जानेवारी, २०२५ पासून उपलब्ध होतील असे जाहिर केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार हॉल तिकीटवरील कास्ट कॅटेगरी (जात प्रवर्गाची श्रेणी) चा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कोणताही दुरुपयोग न होण्याबाबत शासनाककडून कोणती उपाययोजना तसेच कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मंडळामार्फत सदरचे जात प्रवर्ग नमूद केलेली प्रवेशपत्रे रद्द करण्यात येऊन सुधारित प्रवेशपत्रे दिनांक २०.०१.२०२५ पासून मंडळ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली होती.सुधारीत प्रवेशपत्रे वेळीच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या लॉगीन वर उपलब्ध करुन देण्यात आली होती व सदरची प्रवेश पत्रे विद्यार्थ्यांना विहित मुदतीत मिळाल्याने इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा देखील सुरळीत पार पडली आहे.

(३) व (४) होय , हे खरे आहे.

विद्यार्थ्यांचे परीक्षेची आवेदनपत्रे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्द्तीने भरली जातात. त्यात शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून अनावधानाने जात प्रवर्ग नोंदवताना चुका होतात त्यामुळे मंडळामार्फत प्रथमतःच विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांवर जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला होता.निकालानंतर विविध स्कॉलरशिप तसेच पुढील शिक्षणाच्या प्रवेशाकरीता माहिती देताना त्यात त्रुटी असल्यास विद्यार्थ्यांना नाहक त्रास होवून विद्यार्थी विविध लाभांपासून वंचित राहतात. फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेकरीता मंडळामार्फत नविन सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून प्रवेशपत्रात QR Code, तारीखनिहाय वेळापत्रक पेपर तसेच पडताळणीच्या दृष्टीने जात प्रवर्ग इ. बदल करुन त्याची नोंद घेण्यात आली होती.

सुधारीत हॉल तिकिटे २० जानेवारी २०२५ रोजीच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

खडकवासला धरणातून जुन्या मुळा मुठा (लहान) कालव्यात क्षमतेपेक्षा जास्त पाणी सोडल्याबाबत

(२६) २१५६ (२८-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खडकवासला धरणातून जुन्या मुळा मुठा (लहान) कालव्यात क्षमतेपेक्षा जास्त पाणी सोडल्याने उरळीकांचन परिसरातील पांढरस्थळ येथील कालवा फुटून पाणी पुणे सोलापूर महामार्गावर आल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवर्तन सोडण्यापूर्वी कालव्यातील साफसफाईची कामे करणे गरजेचे असताना केवळ पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने कालव्याची सफाई न करताच आवर्तन सोडण्यात आल्याने प्रवाहाला अडथळा निर्माण झाला आणि त्यामुळे कालवा फुटला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

जुना मुठा उजवा कालव्याच्या कि.मी. २८ मध्ये पुणे महानगरपालिकेने अंशत: प्रक्रिया केलेले सांडपाणी मुंढवा जॅकवेल मधून उपसा करून सोडण्यात येते व तेथून पुढे सिंचनासाठी वापरण्यात येते. मुंढवा जॅकवेल पंपीग स्टेशनची क्षमता ८ पंपांची आहे, तथापि दिनांक २९/१२/२०२४ रोजी ४ च पंप सुरु होते. त्यामुळे कालव्यात क्षमतेपेक्षा जास्त पाणी सोडण्यात आलेले नाही.

दिनांक२९/१२/२०२४ रोजी रात्रीचे सुमारास जुना मुठा उजवा कालवा कि.मी. ५७ मध्ये कालव्यामध्ये जलपर्णी मोठ्या प्रमाणावरती अडकून पाण्याचा फुगवटा निर्माण होऊन कालव्यातील पाणी कालव्याच्या बाहेर पडून काही प्रमाणात पाणी पुणे सोलापूर महामार्गावर आले होते. तथापि सदर घटनेमुळे कोणत्याही प्रकारचे पिक नुकसान झालेले नाही.

तसेच सदर घटना घडलेनंतर तातडीने पंप बंद करुन पाण्याचा प्रवाह कमी करण्यात आला व कालव्यातील जलपर्णी तातडीने काढण्यात आली.

(२) हे खरे नाही.

दरवर्षी जुना मुठा उजवा कालव्याची साफसफाई करण्याकरिता यांत्रिकी विभागामार्फत मशीन उपलब्ध करुन घेऊन कालव्याची साफसफाई करण्यात येते.

जुना मुठा उजवा कालव्यामध्ये पुणे महानगरपालिकेने सांडपाण्यावर पुर्णत: प्रक्रिया करुन तद्नंतर ते पाणी सिंचनासाठी सोडणे अपेक्षित आहे. तथापी पुणे महानगरपालिकेद्वारे अंशत: प्रक्रिया केलेले दुषित पाणी कालव्यात सोडण्यात येते. त्यामुळे कालव्यात वारंवार मोठ्या प्रमाणात पाणवनस्पती व जलपर्णी साचली जाते व त्यामुळे कालव्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण होऊन वरील बाजूस पाण्याचा फुगवटा तयार होतो. तथापि आवश्यकतेनुसार वेळोवेळी जलपर्णी काढण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बोरगाव अंजनपुर (ता. जि. लातूर) निम्न पातळी बंधाऱ्यावर नवीन उभे उचलद्वार बसविण्याबाबत

(२७) २२१२ (२८-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव अंजनपुर (ता.जि. लातूर) या बंधाऱ्यावर निम्न पातळी बंधारा द्वार दुरुस्तीसाठी मुळी बंधाऱ्याच्या धर्तीवर नवीन उभे उचलद्वार बसविण्याबाबतचे रु.१४.३० कोटी किंमतीचे विशेष दुरुस्ती अंतर्गतचे अंदाजपत्रक दर पृथ्थ:करण करून घेऊन मंत्रालय स्तरावर सादर करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर पृथ्थकरण करून देण्याबाबतची मागणी कार्यकारी अभियंता, मुख्यद्वार उभारणी पथक.क्र. ४, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, मुख्यद्वार उभारणी पथक.क्र. ४, छत्रपती संभाजीनगर. यांनी सदर अंदाजपत्रकातील दर हे शनिदेवगाव उच्च पातळी बंधा-यावरून घेतले असून अंदाजपत्रकीय दर हे तत्कालीन शासनास प्रस्तावित यांत्रिकी दरसूची प्रमाणे आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावित दरसुचीस सन २०२३-२४ प्रमाणे शासन स्तरावर मान्यता प्राप्त झाली असून यामुळे सदर अंदाजपत्रकास दर पृथ्थकरणाची आवश्यकता भासली नसल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बोरगाव अंजनपुर निम्न पातळी बंधारा द्वार दुरुस्ती प्रस्तावातील यांत्रिकी घटकांच्या अंदाजपत्रकातील दर पृथ्थकरण करून घेणे आवश्यक नसल्याने सदर प्रस्तावास मंजुरी देणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी (केज मतदारसंघ) यांनी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६.१२.२०२४ रोजीच्या निवेदनाद्वारे याबाबत मागणी केली आहे.

(६) सदर विशेष दुरूस्तीचे अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

ईस्थळ (ता. केज, जि. बीड) येथील लासरा उच्च पातळी बंधारा या बॅरेजेसच्या विशेष दुरुस्ती कामांबाबत

(२८) २२२६ (०१-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईस्थळ (ता. केज, जि. बीड) येथील लासरा उच्च पातळी बंधारा या बॅरेजेसचे बांधकाम होऊन १५ वर्षे झालेली असल्यामुळे मोठ्या स्वरुपाच्या विशेष दुरुस्ती अंतर्गत सदर बॅरेजेसचे फक्त विद्युत व यांत्रिकी कामांचा प्रस्ताव शासनास सादर झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरपरिस्थित बॅरेजवर जाण्यासाठीच्या रस्त्यावर खड्डे असल्यामुळे अडचणी येत असून आपात्कालीन स्थितीत बॅरेजवर कर्मचाऱ्यांना थांबण्यासाठी सोय नसल्यामुळे त्याचा परिणाम पुरनियंत्रणावर होऊन प्रकल्पास धोका उद्भवू शकतो, तसेच पुरामुळे शेतीचे नुकसान होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रस्तावात स्थापत्य कामांचाही अंतर्भाव करून दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ च्या बैठकीत स्थापत्य कामांकरीता १५ ते २० % खर्चास मान्यता देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अतिरीक्त मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने स्थापत्य कामासाठी किती निधी उपलब्ध करून दिला आहे वा देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) नाही.

लासरा उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकाम सन २०१९ मध्ये पूर्ण झाले आहे. मांजरा, तेरणा व रेणा नदीवरील एकूण २२ बॅरेजचे विशेष दुरूस्ती प्रस्ताव शासनास प्राप्त असून त्यात लासरा बॅरेजचा समावेश नाही.
(२) नाही.

आपत्कालीन स्थितीत लासरा बॅरेजवर जाण्यासाठी पोहोच रस्ता सद्यस्थितीत व्यवस्थित असून कर्मचाऱ्यांकरीता तात्पुरती Vigilance Room आहे.
(३) होय.
(४) शासनास प्राप्त २२ बॅरेजच्या विशेष दुरूस्ती प्रस्तावांमध्ये लासरा बॅरेजचा समावेश नसल्याने स्थापत्य कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर शासनास हस्तांतरित करण्याबाबत

(२९) २२४१ (०५-०५-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर द्वारा संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय तुळजापूर महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर व श्री. गुरुगोविंद सिंह अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या महाविद्यालयाचे रूपांतर स्वायत्त संस्थेमध्ये झाल्यामुळे मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांच्या हक्काच्या सुमारे ७० टक्के कोट्यातील जागा कमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शितल जवानी मंदिर संस्थान, तुळजापूर द्वारा संचलित श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर शासनास हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव तुळजापूर संस्थान यांच्यामार्फत शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने यापूर्वी नगरपरिषद, अचलपूर जिल्हा अमरावती यांच्याद्वारे चालविण्यात येणारे पॉलिटेक्निकल कॉलेज शासनास शासन निर्णय व्हिड क्रं.MNU-२०१५/P.K.१४४/NV-१८ दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास हस्तांतरित केले त्याच आधारे तुळजापूर मंदिर संस्थान तुळजापूर द्वारा संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय तुळजापूर शासन हस्तांतरित करून घेणार आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-०९-२०२५) : (१) हे, खरे नाही.

तथापि, माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये लोकप्रतिनिधींनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर द्वारा संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे महाराष्ट्र शासनास हस्तांतरीत करण्याबाबतची विनंती प्राप्त झाली आहे.
(२) प्रवेश नियमानुसार स्वायत्त शासकीय तसेच शासन अनुदानीत अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील प्रवेश राज्य स्तरीय

(State Level) कोट्यातून करण्यात येतात. सदरहू दोन्ही महाविद्यालये स्वायत्त असल्यामुळे या महाविद्यालयांमध्ये होम युनिव्हर्सिटी कोटा (७० टक्के कोटा) नाही.

(३), (४) व (५) श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर द्वारा संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे महाराष्ट्र शासनास हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने सुलभपणे कार्यवाही करण्यासाठी दिनांक ३०.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये तपासणी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

खैराव -मानेगाव उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(३०) २२८१ (२८-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) येथील पूर्व भागातील कायम दुष्काळी भाग असलेल्या मानेगाव, धानोरे, बुद्रुकवाडी, कापसेवाडी, हटकरवाडी पाचफुलवाडी ही गावे गेल्या अनेक वर्षापासून पाण्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांना पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असून या भागातील क्षेत्र अद्यापही सिंचनाखाली आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खैराव, (ता.माढा, जि.सोलापूर) येथील कोल्हापुरी पद्धती बंधाऱ्यातून खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनेद्वारे बंद प्रणालीद्वारे पाणी देण्यासाठी दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजी जलसंपदा विभागाने मंजुरी देऊन प्रस्ताव अहवाल सादर करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकल्प अहवालास अद्यापही प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रस्ताव तात्काळ मागवून त्यास प्रशासकीय मान्यता द्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मागणीच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२५) : (१) होय अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुका हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येत आहे. सदर माढा तालुक्यातील मानेगाव अंशत: भीमा-सिना जोड कालवा या प्रकल्पांतर्गत अंतर्भूत आहे. उर्वरीत पूर्व भागातील मानेगाव धानोरे, बुद्रुकवाडी, कापसेवाडी, हटकरवाडी, पाचफुलवाडी ही गावे सिंचना पासून वंचित आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

माढा तालुक्यातील मानेगाव अंशत: भीमा-सिना जोड कालवा या प्रकल्पांतर्गत अंतर्भूत आहे. उर्वरीत पूर्व भागातील मानेगाव धानोरे, बुद्रुकवाडी, कापसेवाडी, हटकरवाडी, पाचफुलवाडी ही गावे सिंचना पासून वंचित आहेत.

(३) होय हे खरे आहे

(४) होय हे खरे आहे.

खैराव मानेगाव उपसा सिंचन योजना ता-माढा, जि-सोलापूर या योजनेचा मुळ प्रशासकिय मान्यता अहवाल राज्यतांत्रिक सल्लागार समिती-२, पुणे यांच्याकडे छाननी होऊन महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र.मकृखोविम/०२/(३४५/२०२४)/प्रबां-१/ ०१३० दिनांक१०.०१.२०२५ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरण यांची मान्यता नसल्याने तसेच प्रकल्पाच्या बाबत तांत्रिक पूर्तता अपूर्ण असल्याने याबाबत पूर्तता करण्याचे निर्देश शासन पत्र दिनांक १६/०५/२०२५ अन्वये दिलेले आहेत.

(५) होय, हे खरे आहे.

(६) प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झालेवर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

तट बोरगाव (ता. केज, जि. बीड) ते रांजणी रस्त्यावरील मांजरा उजव्या कालव्यावरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

(३१) २३२४ (२८-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तट बोरगाव, (ता. केज, जि. बीड) ते रांजणी रस्त्यावरील उजव्या कालव्यावर पूल जीर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करुन तट बोरगाव शिवारात इतर ०३ नवीन पुलांना मंजुरी देऊन कामे सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांचेकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मांजरा प्रकल्पाच्या कालवा वितरण प्रणालीची विशेष दुरूस्ती अंतर्गत दुरूस्ती कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाच्या ८४ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ८४/१० अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. उपरोक्त निवेदनामध्ये नमूद कामांचा अंतर्भाव सदर प्रस्तावामध्ये करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण तालुक्यातील प्रसिद्ध संत ज्ञानेश्वर उद्यानातील कामे प्रलंबित असल्याबाबत

(३२) २३४७ (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रसिद्ध संत ज्ञानेश्वर उद्यानासाठी (ता. पैठण, जि. छ.संभाजीनगर) तब्बल रुपये २७ कोटी इतका खर्च करूनही अंदाजपत्रका प्रमाणे काम न झाल्याचे जिल्हाधिकारी, छ. संभाजीनगर यांच्या दिनांक २ जानेवारी, २०२४ रोजी वा सुमारास करण्यात आलेल्या पहाणी दौ-यात निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित कंत्राटदारांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी मध्ये काय आढळून आले आहे, त्याअनुषंगाने संबधित कंत्राटदार व दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्रभवत नाही.

कृष्णा मराठवाडा (जि. धाराशिव) सिंचन प्रकल्पांतर्गत टप्पा क्र. ६ ला प्राधान्यक्रम मिळण्याबाबत

(३३) २४८३ (२४-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासाठी संजीवनी असणारा कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्रं.२ अंतर्गत टप्पा क्रं.१ ते टप्पा क्र.५ मधील बहुतांश कामे पूर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर प्राधान्य कामातील कामामुळे (उपसा सिंचन योजना क्र.२ टप्पा ५ अंतर्गत रामदारा साठवण तलाव पर्यंत) एकूण ३७८४ हेक्टर (३४.८२) सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सिंचन प्रकल्प टप्पा क्र.६ ला प्राधान्यक्रम मिळाल्यास धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, लोहारा, व उमरगा या तालुक्यातील किमान ७०७८ हेक्टर क्षेत्र (६५.१८) क्षेत्र सिंचनाखाली येणार असून या बाबतचा प्रस्ताव क्र.३८५/२३ मो.प्र.यो. हा शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू टप्पा क्र.६ च्या कामास प्राधान्यक्रम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून कृष्णा मराठवाडा (जि. धाराशिव) सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र.२ मधील टप्पा क्र. ६ रामदरा ते एकुरगा यास प्राधान्यक्रम मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अलमट्टी धरणातील पाण्याचा विसर्ग न झाल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील गावांमध्ये पूरस्थिती निर्माण होत असल्याबाबत

(३४) २४९४ (२४-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून यावर उपाययोजना सुचविण्यासाठी वडनेरे पूर अभ्यास समिती गठीत करण्यात आली असून या समितीने कृष्णा-भीमा, पंचगंगा व वारणा नदी खोऱ्यातील पूरपरिस्थितीचा अभ्यास करून त्याचा निष्कर्ष व शिफारशी शासनास सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलमट्टी धरणाची उंची ५१९.६० असताना पश्चिम महाराष्ट्रात पूर स्थिती निर्माण होत असून कर्नाटक शासनाकडून सदर धरणाची उंची पाच मीटरने म्हणजेच ५२४.६० एवढी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने अलमट्टी धरणातील पाण्याचा विसर्ग न झाल्यामुळे पाण्याची पातळी वाढून कोल्हापूर, सांगली, साताऱामध्ये पूर परिस्थिती निर्माण होवून पूराच्या पाण्यामुळे नागरीकांच्या शेतीचे, जनावरांचे, पिकांचे, घरांचे, दुकानांचे मोठया प्रमाणात नुकसान होणार असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलमट्टी धरणातील पाण्याचा विसर्ग एका क्षमतेपेक्षा जास्त वाढविल्यास कर्नाटकमध्ये पूर परिस्थिती

निर्माण होत असल्याने विसर्ग वाढविण्यासाठी कर्नाटक शासन तयार होत नसल्याने उक्त पूर परिस्थिती ओढवू नये याकरिता कर्नाटक सरकारसोबत मुख्यमंत्री स्तरावर बैठक आयोजित करून, बोलणी करून संयुक्त योजना करार स्वरूपात निश्चित करण्याची आवश्कता असून उक्त धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयास राज्य शासनाकडून स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गंभीर प्रकरणी शासनाने भविष्यात पुन्हा पूर परिस्थिती उद्भवू नये याकरिता शासनाने वडनेरे पुर अभ्यास समितीने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत व उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

कृष्णा नदीला सातत्याने येणारा महापूर लक्षात घेता कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने भिमा व कृष्णा खोऱ्यात सन-२०१९ मध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीची कारणे शोधणे व भविष्यकालीन उपाय योजनेबाबत अभ्यास करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी जलसंपदा विभागाच्या दिनांक१२.१०.२०२१ व दिनांक१५.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्विकृत, अस्विकृत, अंशत: स्विकृत केल्या आहेत.
(२) अलमट्टी धरणामुळे होणाऱ्या परिणामाबाबत अधिक ठोस निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता समितीने नमूद केली आहे. अलमट्टी धरणाची उंची ५१९.६० वरुन ५२४.६० मी. पर्यंत वाढविल्यास पश्चिम महाराष्ट्रात उद्भवणाऱ्या पूर परिस्थितीबाबत NIH, रुरकी यांचेमार्फत सखोल अभ्यास प्रगतीत आहे.
(३) आंधप्रदेश राज्याने अलमट्टी धरणाची उंचीवाढ व इतर बाबी संदर्भात कर्नाटक राज्याच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये SLP दाखल केलेली आहे. कृष्णा पाणी तंटा लवाद-२ च्या निर्णयाच्या अनुषंगाने दाखल होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामार्फत सावधानपत्र (Caveat) दाखल करण्यात आलेले आहे.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्री, कर्नाटक यांना दिनांक०९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये तसेच मा.मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांच्यामार्फत मा.उपमुख्यमंत्री, कर्नाटक यांना दिनांक०४.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अलमट्टी धरण उंचीवाढ न करणेबाबत कळविण्यात आले आहे.
४) कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कृष्णा, भिमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्यात येत आहे.
५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कंडारी (ता.परांडा, जि.धाराशिव) कालव्यात सीना कोळेगांव धरणातील पाणी सोडण्याबाबत

(३५) २५२४ (२४-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंडारी (ता. परांडा, जि.धाराशिव) येथील शेतक-यांनी सीना-कोळेगांव धरणातील पाणी कंडारी कालव्यामध्ये सोडण्यात यावे याकरीता दिनांक १६ जानेवारी, २०२५ वा त्या सुमारास सनदशीर मार्गाने कार्यकारी अभियंता सीना-कोळेगांव यांच्याकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीना-कोळेगांव धरण १०० टक्के भरलेले असतांनाही संबंधीत अधिकारी पाण्याचे नियोजन करत नसल्यामुळे तेथील स्थानिक शेतकऱ्यांना त्रास देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह पाण्याचे नियोजन करुन स्थानिक शेतक-यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०८-२०२५) : (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

यासंदर्भात शेतकऱ्यांकडून पाणी मागणी अर्ज (नमुना ७) भरून दिनांक२२/०१/२०२५ पासून परंडा बाजू उपसा सिंचन योजना कार्यान्वित करून कंडारी कालव्यास ०.५२ दलघमी पाणी सोडण्यात आलेले आहे. त्यामुळे संबंधितांवर कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबाजोगाई व केज (जि. बीड) तालुक्यातील नवीन साठवण तलावांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(३६) २५८६ (०१-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई व केज तालुक्यातील (जि. बीड) येथील एकूण १४ ठिकाणच्या साठवण तलावांचा जलसंपदा विभागाच्या भविष्यकालीन योजनांमध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एकूण १४ ठिकाणच्या परिसरात पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे शेतीलाही पाणी उपलब्ध होत नाही, त्यामुळे उक्त ठिकाणच्या साठवण तलावांना पाणी उपलब्ध करून देऊन मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने १४ पैकी किती साठवण तलावांना मंजुरी दिली वा देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२५) : (१) अंशतः खरे आहे.

(२) होय,

अंबाजोगाई व केज तालुक्यातील (जिल्हा बीड) एकुण १४ प्रकल्पांना पाणी उपलब्ध करुन देऊन मंजुरी देणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे कडून दिनांक ०४/०७/२०२३ रोजीचे पत्राव्दारे मा. उप मुख्यमंत्री, तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे करण्यात आलेली आहे.

(३) उक्त १४ साठवण तलावापैकी बुट्टेनाथ सा.त., कुरणवाडी सा.त.,राक्षसवाडी सा.त., मांडवा तांडा सा.त. व चिंचखंडी सा. त. या ५ प्रकल्पांचा समावेश नियोजनात करण्यात आलेला होता. बुट्टेनाथ साठवण तलावास (२० दलघमी) पाणी उपलब्ध होऊ शकत नाही असे महामंडळाकडुन शासनास कळविण्यात आले आहे. त्यानुसार बुट्टेनाथ सा. त. सद्यःस्थितीत नियोजनात गृहीत धरण्यात येत नाही.

उर्वरीत ४ प्रकल्पांचा अस्तित्वातील प्रकल्पांवर परिणाम होत असल्याने दि १४/१०/२०२१ चे शासनपत्रातील अटींची पुर्तता होत नाही. त्यामुळे अद्याप प्रकल्पास तत्वतः मान्यता प्राप्त नाही. उर्वरीत ९ प्रकल्प नियोजनात समाविष्ट नाहीत..

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सहकारी पाणी पुरवठा संस्थासह वैयक्तिक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी मीटर जलमापक यंत्र बसविण्याबाबत

(३७) २६९६ (२८-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने राज्यातील सहकारी पाणी पुरवठा संस्थांसह वैयक्तिक कृषीपंपाना पाणी मीटर (जलमापक यंत्र) दिनांक ३० जून,२०२५ पर्यंत बसविण्याची सक्ती केली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मीटरचे पैसे शेतक-याच्या कारखान्यात गेलेल्या ऊस बीलातून वसुल करण्याबाबत कारखाना प्रश्नासनास जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धरणामध्ये मुबलक पाणी असतांना सिंचनासाठी पाणी वापरण्यावर मर्यादा येणार असून मीटरनुसार जादा पाणीपट्टीचा भुर्दड बसणार आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात सततची नापिकी, दुष्काळ अवेळी होणाऱ्या पावसामुळे शेतकरी आर्थिक संकटात असतांना शेतीसाठी पाणीपट्टी द्यावी लागणार असल्यामुळे कृषीपंपाना पाणी मीटर बसविण्याचा निर्णय रद्द करण्याची शेतकऱ्यांनी मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०९-२०२५) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक२९ मार्च, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेशातील परिशिष्ट-१ मधील इतर अनुषंगिक तरतूदी मधील परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्यानुसार खाजगी उपसा सिंचन योजनेच्या लाभार्थ्यांना घनमापन पध्दतीने ठोक जलप्रशुल्क आकारण्यासाठी जलमापक यंत्र बसविणे अनिवार्य केले आहे. तथापि, संक्रमण कालावधीत क्षेत्राधारित दर आकारण्याची तरतूद केली आहे. हा संक्रमण कालावधी एक वर्षापुरता मर्यादित होता. तद्नंतर, प्राधिकरणाचे आदेश क्र.०१/२०२४, दिनांक२ फेब्रुवारी, २०२४ अन्वये दिनांक२९ मार्च, २०२२ रोजीच्या आदेशातील परिशिष्ट १ इतर अनुषंगिक परिच्छेद ५ च्या आदेशामध्ये जी सवलत केवळ एक वर्षासाठी अनुज्ञेय केली होती, ती आता दिनांक३० जून, २०२५ पर्यंत लागू राहील, असे आदेशित केलेले आहे.
(२) हे खरे नाही.

शासन निर्णय, दिनांक१५.१०.२०२४ अन्वये उपसा सिंचनाकरीता मीटर बसविणेची कार्यवाही महामंडळाच्या बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीद्वारे उपलब्ध निधीतून करावी व त्याची वसुली तीन टप्प्यात पाणीपट्टी वसुलीसोबत करावी, तसेच नवीन उपसा परवाने देताना मीटरची रक्कम आगावू घेऊन ते बसविण्याची कार्यवाही महामंडळानी करावी, असे निर्देश दिले आहेत.
(३) हे खरे नाही.

घनमापन पध्दतीने मोजल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष पाणी वापरानुसार पाणीपट्टीची आकारणी होणार आहे. मीटर न बसविता पाणी घेतल्यास क्षेत्राधारित दर आकारणी करण्याची तरतूद आहे. त्यामुळे सिंचनासाठी पाणी वापरण्यावर मर्यादा येण्याचा तसेच मीटरनुसार जादा पाणीपट्टीचा भुर्दंड बसण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) होय.

कृषीपंपाना जलमापक यंत्र बसविण्याच्या निर्णय रद्द करण्याची शेतकरी, लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र इरिगेशन फेडरेशन यांनी मागणी केली आहे.
(५) मा.लोकप्रतिनिधीं व महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन यांच्याकडून प्राप्त झालेली विनंती विचारात घेऊन शासनाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास दिलेल्या सुचनेनुसार त्यांनी दिनांक०२.०२.२०२४ च्या सुधारणा आदेशान्वये संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी / वैयक्तिक उपसा सिंचन धारकांची आकारणी क्षेत्राधारित करण्याची सवलत दिनांक३०.०६.२०२५ पर्यंत वाढवली आहे.

खाजगी उपसा सिंचन योजनाकरिता क्षेत्राधारित दर देण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे. तोपर्यंत शासन पत्र, दिनांक२६.०६.२०२४ अन्वये, खाजगी उपसा सिंचना योजनाकरिता प्रवाही सिंचनासाठी क्षेत्रआधारित अनुज्ञेय दरानुसार आकारण्यास सद्य:स्थितीत स्थगिती देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

माणिकपुंज मध्यम प्रकल्प अंतर्गत नियोजित आराखड्याप्रमाणे कालवा व त्याच्या वितरिकांचे काम पूर्ण होण्याबाबत

(३८) २८३७ (२४-०४-२०२५). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि. नाशिक) या अवर्षणप्रवण तालुक्यातील सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी परिसरातील ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार मन्याड नदीवर माणिकपुंज प्रकल्प बांधण्यात आला असून सदरील धरण क्षेत्रात एकूण पाणलोट क्षेत्र २६४.१८ चौ.कि.मी.(१०२ चौ.मैल) असून नांदगाव व चाळीसगाव तालुक्यातील १० ते १२ गावांना ह्याचा फायदा होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाळीसगाव तालुक्यातील राजदेहरे, पिंपळगाव, घोडेगाव आदी गावांना सिंचनासाठी माणिकपुंज उजवा कालव्याचा लाभ होत असून सदरील कालव्याचे उर्वरित गावांमधील काम ठेकेदाराने धिम्या गतीने केल्यामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात जलसंपदा विभागाने दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांना सदरील विषयाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याबाबत पत्र पाठविण्यात आलेले असून अद्याप शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर माणिकपुंज धरण व मन्याड धरण भरल्यानंतर वाहून जाणारे पाणी वरील पाटचाऱ्या पूर्ण झाल्यास उंबरखेड व चितेगाव प्रकल्पात टाकता येईल व या दोन्ही धरणाच्या आजूबाजूच्या १०-१२ गावांच्या पाण्याचा प्रश्न देखील मार्गी लागेल, याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१३-०८-२०२५) : (१) होय हे खरे आहे.

नांदगाव तालुक्यातील जळगाव बु., जळगाव खु., पिंपरखेड, परधाडी, हिंगणदेहरे, पिंप्री हवेली या गावांतील एकूण २४१३ हे. व चाळीसगाव तालुक्यातील राजदेहरे, पिंपळगाव, घोडेगाव या गावांतील एकूण २७२ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होतो.

(२) नाही.

कालव्याचे चाळीसगांव तालुक्यातील उर्वरीत काम (किमी १६ ते २१) सन २०१८ मध्ये पूर्ण झाले आहे. सदर कामामुळे राजदेहरे, पिंपळगांव व घोडेगांव या गावांना सिंचनाचा लाभ होत आहे. वितरीका क्रमांक २३ व २४ ह्या चाळीसगांव तालुक्यात असून काम प्रगतीपथावर आहे व मार्च, २०२६ अखेर प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्प पूर्ण करणेकरीता सुप्रमाची आवश्यकता असून, रा.तां. स. स-१, नाशिक यांच्या दिनांक०६.०५.२०२५ रोजी झालेल्या २३२ व्या बैठकीत सुप्रमावर उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल रा.तां.स.स., नाशिक यांना सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) नाही. सदर अहवाल महामंडळाचे पत्र कासं/तापाविम/प्रशा-२/७४३ दिनांक १८/०२/२०२५ अन्वये दिनांक २४.०२.२०२५ रोजी शासनास प्राप्त झालेला आहे.

(४) माणिकपुंज धरण हे मन्याड नदीवर असून धरणाच्या खालील बाजूस मन्याड मध्यम प्रकल्प, ता. चाळीसगांव आहे. माणिकपुंज प्रकल्प अहवालानुसार माणिकपुंज धरण व मन्याड धरण यांचे पाणलोट क्षेत्र एकच असून माणिकपुंज धरण भरल्यानंतर सदर पूरपाणी नदीद्वारे मन्याड धरणात जाते. सदर धरण भरल्यानंतर वाहून जाणारे पाणी उंबरहोळ व चितेगाव प्रकल्पात टाकणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. तसेच प्रकल्प अहवालानुसार माणिकपुंज व मन्याड या दोन्ही प्रकल्पात उपलब्ध पाण्याचे नियोजन पूर्ण झाले असून त्यात उंबरहोळ व चितेगाव प्रकल्पात पाणी टाकण्याची तरतूद समाविष्ट नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रंथालय संघाच्या मागण्यांची अंमलबजावणी करणेबाबत

(३९) २८७० (०५-०५-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथालय संघाच्या मागण्यांची अंमलबजावणी करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनानुसार शासनाने अद्याप काहीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०७-२०२५) :

(१) हे खरे आहे.

(२) व (३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदान दरात ४० टक्के वाढ करण्याचा तसेच सन २०१२ ते २०२५ या कालावधीत शासनमान्यता रद्द करण्यात आलेल्या ग्रंथालयांऐवजी अन्य व्यवस्थापनाच्या ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना निकषांनुसार दर्जावाढ देण्याचा प्रस्ताव शासन विचाराधीन असून निकषांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

घटप्रभा, ताम्रपर्णी व हिरण्यकेशी (जि.कोल्हापूर) नदीतील गाळ काढण्याबाबत

(४०) २८८९ (२७-०४-२०२५). श्री.शिवाजी पाटील (चंदगड) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड गडहिंग्लज, आजरा, (जि. कोल्हापूर) या तालुक्यात दरवर्षी पावसामुळे नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन नदीच्या आजुबाजूचा संपूर्ण परिसर पाण्याखाली जाऊन नागरिक व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घटप्रभा, ताम्रपर्णी, हिरण्यकेशी नदीत साचलेला गाळ काढण्यात आलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून नदीमधील गाळ तातडीने काढण्याबाबत तसेच सदर परिसरात पावसामुळे वारंवार येणाऱ्या महापुरावर नियंत्रण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०९-२०२५) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक२५.०७.२०२३ मधील परिशिष्ट १ मधील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांच्या लांबीमधील गाळ काढून वहन क्षमता पुनर्स्थापित करण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या दिनांक १५.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये याकरिता मार्गदर्शक कार्यपध्दती विहित केली आहे. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सौदांना व ईस्थळ (ता. केज, जि.बीड) जमीन संपादीत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(४१) ३०२९ (०१-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौदांना व ईस्थळ (ता. केज, जि. बीड) या दोन्ही गावाची जमीन सन- २०१३ च्या कायदान्वये लासरा बॅरेजच्या बुडीत क्षेत्रासाठी संपादित करावयाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपादीत जमिनीचा ८०% रक्कम उपलब्ध करून देण्यात आलेली असून उर्वरित २०% मावेजा रक्कम उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी कार्यकारी संचालक, महामंडळ, छत्रपती संभाजीनगर. यांचेकडे अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ यांनी त्यांचे पत्र. क्र. २७२०, दिनांक २३ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, वा देण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०८-२०२५) :

(१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणामध्ये अंतिम निवाड्याची एकूण रक्कम रु.१,३५,२५,७७३/- इतकी असून दिनांक१९.०५.२०२० व दिनांक२७.०१.२०२५ रोजीच्या धनादेशाने एकूण रक्कम (रु.१,३५,२५,७७३/-) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, अंबाजोगाई यांचेकडे पुढील कार्यवाहीकरिता जमा करण्यात आलेली आहे.

(४) निवाड्याच्या रक्कमेपैकी मौजे ईस्थळ येथील एकूण ०७.७६ हे. भूसंपादीत क्षेत्राचा निधी रक्कम रुपये रु.४३,४४,५१५/- व मौजे सौंदणा येथील एकूण ०.९३५ हे.भूसंपादित क्षेत्राचा निधी रक्कम रुपये ५३,४४,९०६ असा एकूण निधी रक्कम रुपये ९६,४९,८७२/- उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांचेमार्फत भूधारकास वाटप झाला आहे. उर्वरीत क्षेत्राचे भूधारकातर्फे कागदपत्राची पूर्तता होताच उर्वरीत रक्कम वाटप करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक संस्था (आय टी आय) मंजूर झालेल्या जागेवर सुरु करण्याबाबत

(४२) ३०७३ (२८-०४-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावीत सन २०१४ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक संस्था (आय टी आय) स्थापन झाली असून सदर संस्थेला सन २०१६ मध्ये पदांसाठी मंजूरी मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेकरिता तत्कालिन सरकारने ८२ लक्ष मंजूर केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक संस्था जागेअभावी भायखळा येथे सुरु करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मंजूर झालेल्या जागेमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकिय औद्योगिक संस्था (आय टी आय) सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (३०-०६-२०२५) : (१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक०५/१२/२०१२ अन्वये धारावी येथील संस्थेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक१९.०५.२०१७ अन्वये सदर संस्थेकरीता शिक्षकीय व शिक्षकेत्तर २० पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यातं आली आहे. ३. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय दिनांक०८/१०/२०२४ रोजी धारावी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामदार जगन्नाथ (नाना) शंकरशेठ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धारावी, जिल्हा मुंबई शहर असे नामकरण करण्यांस मंजूरी देण्यांत आली आहे.

२) जिल्हा नियोजन समिती, मुंबई शहर यांचेकडून दिनांक २०.१.२०२१ अन्वये संरक्षण भिंतीच्या बांधकामाकरीता रु. ८२,३६,७२३/- मंजूर करण्यात आले त्यापैकी रु. १६.०० लक्ष खर्च झालेला आहे.

(३) नाही, हे खरे नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धारावी ही संस्था सुरु होईपर्यंत आवश्यक ते नियोजन, पूर्वतयारी, मनुष्यबळ इ. सर्व बाबींसाठी मदत व सहकार्य करणेसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई -११ (भायखळा) यांची नेमणुक करण्यात आली होती.

(४) व (५) धारावी, मुंबई येथील न.धू.क्र. १/३१५ या भूखंडावर धारावी औ.प्र. संस्था इमारतीचे (तळमजला + ४ मजली इमारत) बांधकाम करण्याच्या अंदाजपत्रक रु. १४९९.६१ लक्ष कामाच्या अंदाजपत्रकास शासनाने मान्यता दिली असून सदर अंदाजपत्रके जिल्हा नियोजन समिती मुंबई शहर यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आली आहे. तसेच सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकामाकरीता दक्ष प्रकल्पामधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नियोजन करण्याबाबत संबंधितांना कळविले आहे.

उक्त इमारत पूर्ण होईपर्यंत तात्पुरते स्थलांतर जोगळेकर वाडी, महानगर पालिका शाळा, सायन (पूर्व), मुंबई येथे करुन तेथील दोन मजले औद्योगिक प्रशिक्षण संस्था धारावीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १७.१.२०२५ अन्वये बृहन्मुंबई महानगर पालिकेस विनंती केली आहे.

आटपाडी (जि. सांगली) या दुष्काळी तालुक्यातील बंदिस्त पाईपलाईनची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

(४३) ३१४४ (२८-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि. सांगली) या दुष्काळी तालुक्याला वरदान ठरणाऱ्या टेंभू योजनेच्या बंदिस्त पाईपलाईन कामांमध्ये दिघंजी, पांढरेवाडी ,उंबरगाव ,धडसवाडी ,आंबेगाव, बोंबेवाडी ,पिंपरी या गावांमध्ये करण्यात येत असलेली कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने स्थानिकांनी बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांमध्ये स्थानिकांच्या मागणीनुसार कामे करून आंबेवाडी ,बोंबेवाडी ,पिंपरी खुर्द, विठ्ठलापूर, उंबरगाव, पुजारवाडी, पांढरेवाडी(दि),दिघंची या योजनेत गावांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय, अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) विस्तारीत टेंभू उपसा सिंचन योजनेंतर्गत कामथ गुरुत्व नलिका या कामाद्वारे आंबेवाडी, बोंबेवाडी, पिंपरी खुर्द, उंबरगाव, पुजारवाडी, पांढरेवाडी (दिनांक) व दिघंची या गावांमध्ये बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे सुरु आहेत. तसेच विठ्ठलापूर व दिघंची या गावांना टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत आटपाडी डावा कालवा किमी १ ते किमी १० अंतर्गत निंबवडे वितरीका मार्फत निंबवडे ल.पा. प्रकल्पातुन H.R.Gate द्वारे गळवेवाडी, विठ्ठलापूर, कौठुली, लोटेवाडी, देशमुखवाडी येथील ओढ्यातील बंधारे व को.प.बंधाऱ्यासाठी ५५ द.ल.घ.फु. पाणी माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२५ मध्ये

देण्यात आले आहे आणि दिघंची वितरीका मार्फत मौजे दिघंची यादव मळा को.प. बंधाऱ्यासाठी ३० द.ल.घ.फु. पाणी जानेवारी-फेब्रुवारी २०२५ मध्ये देण्यात आले आहे.

दिघंची व विठ्ठलापुर या गावांमधील को.प. बंधाऱ्यांसाठी कामथ गुरुत्व नलिका या कामाच्या निविदेमध्ये भरण नलिकेची तरतूद केली आहे. सद्यस्थितीत विस्तारीत टेंभू योजनेंतर्गत कामथ गुरुत्व नलिकेचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

लघुपाटबंधारे प्रकल्पाची दरसुची सुधारित करण्याबाबत

(४४) ३१५२ (२३-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघु पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना जलसंपदा विभागाचे सद्याचे निकष/मापदंड दिनांक १३ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासन निर्णयाने निश्चित करण्यात आले असून सदरचे निकष/मापदंड सन २०१६-१७ च्या दरसूचिवर आधारीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत सन २०१६-१७ च्या दरसूचिवर आधारीत प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार केल्यास कोणताही लघू पाटबंधारे प्रकल्प दिनांक १३ जुलै, २०१८ रोजीच्या मापदंडात बसत नसल्यामुळे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यास विभागाला अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरिल पार्श्वभूमिवर दिनांक १३ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निकष/मापदंड सन २०२१-२२ च्या दरसूचिनुसार सुधारीत करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुसार दिनांक १३ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयातील निकष/मापदंड सन २०२१-२२ च्या दरसूचिनुसार सुधारीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०८-२०२५) : (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय, खरे आहे.
(४) राज्यस्तरीय लघु पाटबंधारे योजनांचे सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित पाणासाठा प्रती सहस्त्र घन मीटर किंमतीचे मापदंड वाढीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ईसापूर धरणातील पाण्याची तूट भरून काढण्याबाबत

(४५) ३१५४ (२८-०४-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईसापूर धरणात असलेली ५८२ दलघमी पाण्याची तूट भरुन काढण्यासाठी दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यातून पाणी उपशाव्दारे ईसापूर धरणात टाकण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्ध्व पेनगंगा ते निम्न पेनगंगा प्रकल्पातील ५८२ दलघमी शिल्लक पाणी उच्च पातळी बंधाऱ्यामधून उपसा करुन ईसापूर धरणात वळविणे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही कामांना उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा भाग म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव महामंडळाने दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कामांच्या मंजूरीचे आदेश केंव्हा निर्गमित करण्यात येणार आहेत, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या सहाव्या सुप्रमा प्रस्तावामध्ये या दोन्ही कामाच्या सर्वेक्षण व अन्वेषण कामाची तरतुद केलेली आहे. दिगडी व गोजेगाव उपसा योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषण कामाचे अंदाजपत्रक तयार करणे सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

धाराशीव जिल्हयातील ईटा शिवारातील मांजरा नदीवरील संगमेश्वर प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या शेतक-यांना न्याय मिळण्याबाबत.

(४६) ३१८७ (२३-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशीव जिल्हयाची सीमा अधोरेखित करत पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणा-या मांजरा नदीवर मौजे ईट शिवारात सन १९९५ साली संगमेश्वर प्रकल्पाची उभारणी केली असून शेतक-यांना या पाण्याचा फायदा व्हावा या उद्देशाने डावा व उजवा कालवाही तयार करण्यात आलेला होता परंतु गेल्या ३० वर्षाचा कालावधी होऊनही प्रत्यक्षात या कालव्याच्या माध्यमातून शेतक-यांना पाणी मिळाले नसल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त प्रकल्प हा २ हजार १८० एकर जमिनीवर उभारलेला असून ३० वर्षापूर्वी तयार केलेले कालवे जागोजागी नादुरुस्त असून निरपयोगी झालेले आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सन १९९३ साली संपादीत केलेल्या जमिन मालकांना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यांत येते परंतु गेली ३० वर्ष होऊनही कोणत्याही शेतक-याला धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी संगमेश्वर प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या शेतक-यांना न्याय मिळण्यांच्या दृष्टीने शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०८-२०२५) : (१) होय.
(२) होय.

सदर प्रकल्पाची कंदर भरणी सन १९९५ मध्ये करण्यात आली. सदर प्रकल्पाचे दोन्ही कालवे काळया मातीतून जात असल्यामुळे ठिकठिकाणी कालव्याचे भराव काम खचले आहे. तसेच कालव्यावरील बांधकामे ही दगडी बांधकाम प्रकारात असून नादुरुस्त अवस्थेत असल्यामुळे कालव्याद्वारे सिंचन होत नाही. तथापि, शेतक-यांच्या मागणीनुसार सिंचन व्यवस्थापन विभागाकडून धरणामधून कालव्यामध्ये पाणी सोडून अति नियामकाद्वारे (Escape) नाल्यात पाणी सोडून मांजरा नदीवरील कोल्हापूरी बंधारे भरुन सिंचन केले जात आहे.
(३) धाराशिव जिल्हयातील ईट शिवारातील मांजरा नदीवरील संगमेश्वर प्रकल्पासाठी धाराशिव जिल्हयातील संपादीत केलेल्या जमीन मालकांना /प्रकल्पग्रस्तांना धरणग्रस्त / प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रे शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे एकूण १९० प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेली आहेत.
(४) प्रकल्पबाधित व्यक्तीने / प्रकल्पग्रस्ताने नियमानुसार प्रस्ताव दाखल केल्यास संबंधितास ३० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी भुम जि. धाराशिव यांचे स्तरावरुन धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे पिंपळखुटे, कुर्डु अंबाड (ता.करमाळा, जि.सोलपूर) यासह अन्य गावांना सीना माढा उपसा सिंचन प्रकल्पामधून पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४७) ३३०८ (२३-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अभिजीत पाटील (माढा) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळखुटे, कुर्डु अंबाड (ता.करमाळा, जि.सोलापूर) यासह अन्य गावातील स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी वारंवार मागणी केल्यामुळे शासनाने सदर गावांना सीना माढा उपसा सिंचन योजनेतून पिण्याच्या पाणी आरक्षणाला दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास जलसंपदा विभाग कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सीना माढा उपसा सिंचन योजनेतील सदर गावे उंचीवर असल्याने लिफ्ट द्वारे पाणी उचलून गावांच्या शिवारातील पाझर तलाव, गाव ओढा व बेंद ओढा वर्षातून तीन वेळा भरून घेतल्यास भूभार्गतील पाणी पातळी वाढवून त्याचा प्रत्यक्ष लाभ तीन गावासह बेंद ओढ्यावरील १३ गावांना होणार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपळखुटे कुर्डू अंबाडसह बेंद ओढ्यावरील गावांना दुष्काळमुक्त करण्यासाठी लघुउपसा सिंचन प्रकल्पला मंजुरी देऊन प्रकल्पासाठी १५ कोटी रुपयांची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४)असल्यास, उसदर गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासह दुष्काळमुक्त करण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय.

(२) मौजे पिंपळखुटे, कुर्डू व अंबाड (ता.माढा, जि.सोलापूर) या तीन गावांचा भूभाग उंचीवर असलेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जलपुनर्भरण योजना या नावाने लोकसहभागातून मंजूर असलेले १० दलघफू पाणी पिंपळखुटे पाझर तलाव क्र.१,२ व ३ तसेच संलग्न गाव नाल्यावरील १० बंधारे भरणेसाठी सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या मुख्य कालव्यातून मौजे शेडशिंगे येथून उचलून सोडणे व जलपुनर्भरण करणेची मागणी आहे. सदर मागणी ही पिण्याचे पाणी स्त्रोत बळकटीकरणासह भूजल पातळीत वाढ करणारी आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक२६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मौजे बावी, तुळशी, परितेवाडी, कुर्डू, पिंपळखुटे, अंबाड, अंजनगांव-खे या गावांना पिण्याच्या पाण्यासाठी विकेंद्रित जलसाठे भरून देणेच्या कामाचा तृतीय सुप्रमामध्ये समावेश करणेस तत्वत: मान्यता दिली आहे. तसेच सदर गावांतील विकेंद्रित जलसाठे भरून अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देण्यासाठी शासनाची मान्यता प्राप्त होईपर्यंत प्रस्तावित तृतीय सुप्रमामध्ये समावेश करणेचे अनुषंगाने सदर कामाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील सुर्या धरणाच्या लहान कालव्यांमधून सिंचनासाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा अपव्यय टाळण्याबाबत

(४८) ३३९८ (२३-०४-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाच्या लहान कालव्यांमधून सिंचनासाठी सोडण्यात येणारे पाणी शेवटच्या टप्प्यापर्यंत मिळावे तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पाटबंधारे विभागाने बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बंदिस्त वितरण प्रणालीच्या कामास किती निधी मंजूर करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदर काम पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे व सुरु असलेल्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१४-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) (३) व (४) सुर्या उजवा तीर कालव्यावरील पालघर शाखा क्र. २ वरील वितरीका क्र. ३ व थेट लघुपाट क्र. ५ वर बंदीस्त नलिका वितरण प्रणालीचे काम करण्यासाठी सिंचन पुनर्स्थापना निधीतून रू. २५५०.०० लक्ष इतक्या निधीची मंजूरी प्रदान असून सुर्या उजवा तीर कालवा वितरीका क्र. १ व थेट लघुपाट क्र. १ ते ३ वर बंदीस्त नलिका वितरण प्रणालीचे काम करण्यासाठी सिंचन पुनर्स्थापना निधीतून रू. ६९५.०० लक्ष इतका निधी मंजूर आहे. सदर कामांची निविदा कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली असुन सदरहू कामे मे, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.

महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम अंतर्गत (MIIP) सुर्या उजवा तीर कालवा पालघर शाखा क्र. २ वरील वितरीका क्र. १ व २ तसेच थेट लघुपाट क्र.१ ते ४, डहाणू शाखा आणि सुर्या डावा तीर कालवा वितरीका क्र. १ व थेट लघुपाट क्र. १ वर बंदीस्त नलिका वितरण प्रणालीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर कामांची निविदा कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर असून, सदर कामे डिसेंबर, २०२७ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहराकरिता स्वतंत्र "सेवायोजन कार्यालय" सुरु करणेबाबत

(४९) ३६३१ (२८-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील भोसरी, तळवडे, मनपाच्या हद्दीलगत असलेल्या चाकण, औद्योगिक वसाहतीमुळे त्या शहराला "औद्योगिक नगरी" म्हणून ओळख निर्माण झाल्याने तेथे अनेक सुशिक्षित होतकरू युवक-युवती हे रोजगाराची संधी मिळण्याकरिता वास्तव्यास येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शहरातील युवकांना नोकरी शोधण्यासाठी एसएमएस अलर्ट, जॉब मार्केट, व्यवसाय माहिती, करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, कौशल्य विकास, रोजगार मेळावा, तरुणांसाठी प्रशिक्षण इ. माहिती मिळण्याबरोबरच कामगारांची मागणी व पुरवठा यांचा समन्वय साधण्यासाठी उद्योगनगरीकरिता स्वतंत्र 'सेवायोजन कार्यालय' स्थापन करण्याची नितांत आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील सुशिक्षित युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहराकरिता स्वतंत्र 'सेवायोजन कार्यालय' सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कौशल्य विकास मंत्री यांना माहे जानेवारी २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड शहराकरिता स्वतंत्र "सेवायोजन कार्यालय" सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मंगलप्रभात लोढा (०३-०७-२०२५) : (१) शासनाच्या "महास्वयम" या संकेतस्थळावर नोकरीइच्छुक उमेदवारांची नोंदणी केली जाते. सदर संकेतस्थळावरील नोंदीनुसार पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील नोंदणीकृत नोकरीइच्छुक उमेदवारांची संख्या २,७२,६०१ एवढी आहे.
(२), (३) व (४) पिंपरी- चिंचवड शहराच्या परिसरातील औद्योगिकीकरणामुळे रोजगारासाठी सदर शहरात येणाऱ्या युवकांसाठी स्वतंत्र "सेवायोजन कार्यालय" सुरु करण्याची विनंती दिनांक २३.०१.२०२५ च्या पत्रान्वये स्थानिक विधानसभा सदस्य यांच्याकडून करण्यात आली आहे. तथापि, राज्याच्या सेवायोजन कार्यालयांमधून पुरविण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत असून त्याकरीता "महास्वयम" हे संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. नागरिकांना सेवायोजन कार्यालयांतील सेवेचा लाभ घेण्याकरीता प्रत्यक्ष कार्यालयात येण्याची गरज उरलेली नाही. पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यासाठी पुणे येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यरत असून सद्यस्थितीत पिंपरी-चिंचवड करीता स्वतंत्र "सेवायोजन कार्यालय" स्थापन करण्याची आवश्यकता नसल्याचे संबंधित विधानसभा सदस्य यांना दिनांक २५.०६.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रिक्त पदांबाबत

(५०) ३६३३ (०५-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पूर्ण वेळ कुलसचिव व अधिष्ठाता नसल्याने शैक्षणिक व प्रशासनिक कामात अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामकाजाचा अतिरिक्त कार्यभार प्रभारी पद्धतीने सुरू असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अनेक पदे रिक्त असल्याने सक्षम मनुष्यबळाशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, विद्यापीठातील पदभरती कुलसचिव अधिष्ठाता निवडीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०९-२०२५) :(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) विद्यापीठातील विविध सांविधानिक पदांची पदभरती प्रक्रिया विद्यापीठामार्फत चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.